
चे

# चे

## अनुवाद: उदय नारकर

अर्नेस्टो चे गव्हेरा ५३ वा हौतात्म्य दिन

९ ऑक्टोबर २०२०

जनशक्ती प्रकाशन

## अनुक्रमणिका


अनुवादकाचं मनोगत - उदय नारकर

दोन शब्द - मारिया देल कार्मेन अरिएत गार्सिया

प्रस्तावना - ऐजाझ अहमद

'चे' गव्हेरा जीवनपट

अर्नेस्टो चे गव्हेरा यांचे लेख
- क्यूबातील समाजवाद आणि माणूस
- त्रिखंडाला संदेश


पुस्तकाचे मुखपृष्ठ 'ट्रायकॉन्टिनेन्टल'चे प्रमुख डिझायनर तिंग्ज चॅक यांनी बनवलेले आहे. 'चे' रेडिओ रेबेल्डेवर बोलत असताना घेतलेल्या फोटोवर ते चित्र आधारलेले आहे.

# अनुवादकाचं मनोगत

काही वर्षं झाली असतील. मुंबई विद्यापीठाच्या बहुधा इंग्रजी विभागात प्राध्यापक मित्राच्या ऑफिसात बोलत बसलो होतो. तेवढ्यात एक उमदा तरूण सरांना भेटायला आला. त्यांचं काही बोलणं चालू असताना माझं लक्ष त्याच्या टी शर्टवरील चे गव्हेराच्या चित्रावर गेलं. मागील शतकाच्या साठी सत्तरीच्या दशकात समाजवादी, कम्युनिस्ट क्रांतीचं वारं प्यायलेल्यांना ते चित्र नवीन नव्हतं. पण नव्या शतकातल्या जगातही ते काळानं काळवंडलं तर नव्हतंच पण त्याला एक ग्लॅमर आलं होतं. तरूणतरूणीत अमिताभ बच्चन किंवा अॅव्हेन्जर्सहूनही पॉप्युलर. मी त्या तरूणाला त्या चित्रातील माणसाबद्दल विचारलं, आणि त्याच्या उत्तरानं माझी नाही म्हटलं तरी निराशाच झाली. 'सम गाय हू वॉज अगेन्स्ट द रिच . . .' असं काही तरी तो पुटपुटला. पठ्ठ्या नुसताच 'कूल डूड' निघाला!

या चित्राचीही एक चित्तरकथाच आहे. चे गव्हेराचा तो मूळ फोटो काढलेला आहे १९६० मध्ये. आणि गेल्या साठ वर्षात त्यावर कालबाह्यतेची सुरकुतीही आलेली नाही. फोटोमागील मूळ उद्देश ओलांडून जगात असल्यानसल्या साऱ्या सीमारेषा त्यानं पार केल्या आहेत. तो चेहरा केरळमधील कम्युनिस्ट पक्षाच्या ऑफिसच्या भिंतीवर ज्या दिमाखानं झळकत असतो, त्याच बेमुर्वतखोरपणे तो न्यू यॉर्कमधल्या क्लबमध्ये टेनिस खेळणाऱ्या एखाद्या मल्टिनॅशनलच्या सीईओच्या छाताडावर बसलेला दिसतो. त्याची क्रयवस्तू करून त्या महानायकाचं सत्त्व पुसायचा कितीही प्रयत्न केला, त्याचं विनिमय मूल्यात अवमूल्यन करायचा घाट घातला, तरी जगात बदल करू पहाणाऱ्यांच्या नजरेत त्याचं उपयोगिता मूल्य अक्षय टिकून आहे. त्याच्या डोक्यावरची ती जगाला फाट्यावर मारणारी लाल तारा मिरवणारी कॅप अलगद कुणाच्याही डोक्यावर जाऊन बसते: कधी येशू ख्रिस्ताच्या, कधी मॅडोनाच्या तर कधी प्रिन्सेस डायनाच्याही!

तो मूळ फोटो काढला आहे, अल्बेर्तो कोर्दा या क्यूबन फोटोग्राफरनं. क्यूबाची राजधानी हवाना इथं ५ मार्च १९६० रोजी. आणि त्याला दिलेलं नाव आहे, गरिलेरो हिरोइको - गरिला हीरो, गनिमी युद्धाचा नायक. कॅपला न जुमानता पसरलेली केसांची जणू विमुक्त आयाळ, दूरवरच्या क्षितिजावरील अन्याय-शोषणमुक्त जगावर खिळलेली स्वप्नाळू आणि तरीही भेदक नजर. मोनालिसाच्या चेहऱ्यावर तरळणारं हसू जास्त गूढ की या नरशार्दुलाची, असा संभ्रम पाडणारी. सर्व जगातल्या विद्यार्थी-तरूणांच्या गळ्यातला ताईत बनलेली.

चे नं मांडलेला विचार, त्यानं उराशी बाळगलेली क्रांतिनिष्ठा मिटवण्यासाठी खूप आटापिटा करण्यात आला आहे. पण प्रतिमा पोकळ असत नाही. ती कशाचा तरी निर्देश करत असते. भावनेचा, कृतीचा, विचाराचा, दृष्टीचा, अपेक्षांचा, प्रतिज्ञेचा. 'चे' च्या या प्रतिमेमागील व्यक्तित्व देवासारखं निर्गुण निराकार नाही. जो स्वतःच निर्गुण आणि निराकार आहे, तो जगाला कसला आकार देणार, कसले गुण प्रदान करणार? 'चे'च्या प्रतिमेमागील माणूस मात्र निराकाराला, निर्गुणाला ठाम नकार देणारा आहे. आपल्या अंतरातील 'गुणाकारानं' जगाला भारीत करायची दुर्दम्य इच्छाशक्ती म्हणजे 'चे'. सारे अन्याय जमीनदोस्त केल्यानंतरच्या जगाकडे पहाताना विश्वमानव कसा दिसेल? 'चे' सारखा!

हा फोटो घेण्यात आलेला क्षणही जणू 'चे' च्या अवतरण्याची वाटच पहात होता. क्यूबाची क्रांती म्हणजे केवळ दोन वर्षांचं अर्भक होतं. आणि त्या अर्भकाच्या गळ्याला नख लावण्यासाठी अमेरिकेचे हात कोण शिवशिवत होते. तो साम्राज्यवादाचा राक्षस केव्हा या नवजाताचा गळा घोटतोय, हे सारं जग श्वास रोधून पहात होतं. क्यूबाला

जगण्यासाठी त्याचा सामना करणं भाग होतं. अमेरिकेकडे जगातलं कोणतं अत्याधुनिक शस्त्र नव्हतं? आपण अणुबॉंबचा वापर करून काय करू शकतो, हे त्यानं दाखवून दिलं होतं. त्याच्या सामर्थ्याविषयी कुणालाही शंका नव्हती. अमेरिकेपासून बचाव करण्यासाठी क्यूबानं बेल्जियमकडून काय मागवावं? रायफली आणि ग्रेनेड! कित्येक टनाचा हा माल 'ला कुब्रे' नावाच्या फ्रेंच बोटीतून आला होता. ते जहाज हवाना बंदरात माल उतरायची वाट पहात नांगरून बसलं होतं. पण एकाएकी त्यावर महाभयानक स्फोट झाला. ७५ क्यूबन खलाशी आणि कर्मचारी त्यात जागच्या जागी ठार झाले. २०० जबर जखमी झाले. बंदराचा मोठा भाग पार उध्वस्त झाला होता. अमेरिकेची नजर वाकडी झाली की काय होतं, हे पुन्हा जगाला दिसलं होतं. १८९८ मध्ये अशाच एका स्फोटाचं निमित्त करून अमेरिकेनं त्या वेळच्या, समाजवादाचा गंध नसलेल्या क्यूबावर हल्ला केला होता. त्यासाठीच तर पुन्हा हा स्फोट करण्यात आला नव्हता?

स्फोटाच्या दुसऱ्या दिवशी मृतांचा सामुदायिक अंत्यविधी होता. त्यासाठी एक तात्पुरता मंच उभा करण्यात आला होता. त्यावर फिडेलच्या शेजारी उभे होते, सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ ज्यॉं पॉल सार्त्र आणि तितकीच सुप्रसिद्ध विदुषी आणि सार्त्र यांची पत्नी सिमॉं दि बूव्हॉं. कार्यक्रमाला जरा उशिरा आलेला एक तरूण जरा मागं उभा होता. जॅकेट घातलेला. तो होता अर्नेस्टो 'चे' गव्हेरा. गंमतीची गोष्ट म्हणजे 'चे'नं दिलेल्या निमंत्रणावरूनच सार्त्र आणि सिमॉं त्या कार्यक्रमासाठी आले होते! त्या कार्यक्रमाचे फोटो घेत होता, अल्बर्तो कोर्दा. रेव्होलयूसॉं, क्रांती, या वर्तमानपत्रासाठी. पुढं त्या प्रसंगाची याद काढताना कोर्दा म्हणाला, "चे खूप मागं उभा होता, इतका की दिसतही नव्हता. पण अचानक 'चे' माझ्या कॅमेऱ्याच्या चौकटीत अवतरला आणि क्लिक्. मी कळ दाबली. निळ्या आकाशाच्या कोंदणात त्याचं पोर्ट्रेट साठवल्याचं माझ्या तात्काळ ध्यानात आलं."

तो फोटो नंतर एकदोनदा ओझरता छापला गेल्यानंतर 'चे' सारखाच कित्येक वर्षे सार्वजनिक दृष्टिआड झाला. 'चे' नं १९६५ मध्ये क्यूबा सोडलं आणि जगात क्रांतीसाठी चालू असणाऱ्या गनिमी लढायात सामील व्हायला निघाला; आधी आफ्रिकेतील कॉंगोमध्ये आणि नंतर लॅटिन अमेरिकेत. त्यानंतर १९६७ मध्ये त्याला हौतात्म्य प्राप्त झालं त्या बोलिव्हियात लढत असताना त्याची ही छबी पुन्हा झळकली, पॅरीसच्या एका नियतकालिकात १९६७मध्ये. त्याचा 'दोन नव्हे, तीन नव्हे, अनेकानेक व्हिएतनाम निर्माण करा' हा सुप्रसिद्ध लेख हवानात प्रकाशित झाल्यानंतर. त्यानंतर दोन महिन्यांतच बोलिव्हियाच्या हुकूमशहाच्या सैन्यानं सीआयएच्या मदतीनं डोंगराळ प्रदेशात लढत असताना त्याला पकडलं आणि नंतर गोळ्या घालून ठार केलं. त्याच्या हौतात्म्यासाठी चिरस्मरण करण्यासाठी फिडेलनं हवानाच्या मध्यवर्ती चौकात एक जंगी शोकसभा आयोजित केली. पाठीमागं क्यूबाच्या गृहमंत्रालयाची पाच मजली इमारत होती. त्यावर क्यूबाच्या गळयातील ताईत बनलेल्या 'गेरिल्लेरो हिरोईको' (गनिमी योध्दा) ची त्या इमारतीच्या पाच मजली उंचीची तसबीर विराजमान झाली होती. ती होती कोर्दानं खेचलेली ती ऐतिहासिक छबी. आजही ती पाच मजली तसबीर त्या असीम त्यागाची स्मृती जागी करत दिमाखात झळकते आहे.

तो फोटो स्वतः कोर्दाची अतिशय आवडती कलाकृती बनली. कुणी खास पाहुणा आला की त्याची प्रतिकृती तो भेट म्हणून देई. कॅस्ट्रो आत्मचरित्र लिहित असताना त्याला फेल्ट्रिनेली या इटालियन प्रकाशकानं मोठी मदत केली. फेल्ट्रिनेली स्वतः जहाल डाव्या विचाराचा होता. हा फेल्ट्रिनेली कोर्दाला भेटायला गेला असता त्याला 'चे'ची छबी भेट म्हणून मिळाली. ती सोबत घेऊन फेल्ट्रिनेली इटलीला गेला.

'चे' नं आपल्या बोलिव्हियातील सशस्त्र बंडाची हकिगत लिहिलेली रोजनिशी १९६८ मध्ये प्रकाशात आली, हवानामध्ये. कॅस्ट्रोनं ती छापण्याचे अधिकार फेल्ट्रिनेलीला दिले आणि ती इटालियन भाषेत प्रकाशित झाली, कोर्दाच्या त्या फोटोसकट. त्यानं पुस्तकाच्या मुखपृष्ठावर तो फोटो टाकला. तो फोटो लोकांना इतका आवडला की फेल्ट्रिनेलीनं त्याची हजारो पोस्टर्स छापली. १९६८ मध्ये साऱ्या युरोपातले विद्यार्थी प्रतिगामी समाजाविरुद्ध बंड करून उठले होते. रोज हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरून निदर्शनं करायचे. इटलीतल्या विद्यार्थ्यांनी 'चे' चं पोस्टर आंदोलनात वापरायला सुरवात केली. आ णि 'चे' एका एका राष्ट्राच्या सीमा लीलया ओलांडू लागला. जगातल्या सर्वात बलाढ्य शक्तीशी लढताना रणात देह ठेवलेला तो जिगरबाज तरूण त्यांचा दोस्त बनला. त्याची छबी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांच्या भिंतींवर लटकू लागली. त्याची चित्रं हाताला येईल त्या वळणानं आणि हाती लागेल त्या रंगानं विद्यापीठांच्या भिंती सुशोभित करू लागली. बर्लिन असो की पॅरीस की अगदी न्यू यॉर्क. आपल्या मुंबई, दिल्ली, कलकत्त्यावरही त्यानं गारूड केलं.

जगाला तोपर्यंत हॉलिवुडची पोस्टर्स ठाऊक होती. आपल्याकडे बॉलिवुड, टॉलिवुड वगैरेची. पण पोस्टर्सनी मोठी राजकीय कामगिरी केली होती, रशियन राज्यक्रांतीमध्ये. १९१८ नंतर झालेल्या प्रत्येक समाजवादी क्रांतीत

लोकांनी रंगवलेली, बनवलेली पोस्टर्स जनतेला उठवण्याचं काम करू लागली. लेनिन, माओ, हो चि मिन्ह, फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा आणि देशोदेशीचे स्थानिक जननायक.

याच काळात पाश्चात्य संगीत जगात प्रचंड उलथापालथ झाली. बीटल्स, बॉब डिलन आदींच्या प्रतिमा त्यांच्या गाण्याच्या तबकड्यांवर झळकू लागल्या. 'चे' च्या कॅपवरील लाल तारा बीटल्सच्या "ल्यूसी इन द स्काय विथ डायमंड्स' या गाण्यात अवतरला. इतकंच नव्हे तर तो तारा अॅन्डी वॉऱ्होलनं चितारलेल्या मेरिलिन मन्रोची जुल्फे शृंगारू लागला आणि माओच्या कॅपवरही विराजमान होत प्रतिगाम्यांच्या उरात धडकी भरवू लागला.

चे कम्युनिस्ट क्रांतीचा रॉकस्टारच बनला. पण मृत्यूपश्चात. तो जिवंत असताना त्याचं दर्शन झालं की कित्येकांना वाटे, अरे, क्रांती इतकी देखणी असू शकते? पहाताक्षणी त्याच्या व्यक्तिमत्वाची जादुई छाप पडे. त्या कोवळ्या चेहऱ्यामागे दडला होता, साम्राज्यशाह्यांना उलथू पाहणारा पोलादी कणखरपणा. "जशी ओलसर शिसवी - नक्षी पॉलिशलेली चांदण्यात ती" अशी मूळची कांति क्रांतीच्या धगधगणाऱ्या भट्टीच्या प्रकाशात तळपून निघाल्याशिवाय 'नव्या मनूतिल गिरधर पुतळा' साकारत नसतो.

१४ जून १९२८ रोजी अर्जेन्टिनात जन्मलेल्या डॉ. अर्नेस्टो 'चे' गव्हेरानं अमेरिकन मुजोरीशी लढताना बोलिव्हियाच्या रणात ९ ऑक्टोबर १९६७ रोजी देह ठेवला. केवळ ३९ वर्षाच्या आयुष्यात जगावर अमीट ठसा उमटवणारं काम स्फूर्तिप्रद काम केलं, अनुभवाच्या कानसीवर घासत परजलेले विचार मांडले. त्या विचाराचं शस्त्र नव्या पिढीच्या हाती देण्याच्या हेतूनं ट्रायकॉन्टिनेन्टल या संस्थेच्या पुढाकारानं जगातील वीस प्रकाशक एकत्र येऊन 'चे' च्या ५३ व्या हौतात्म्यदिनी वीसेक भाषांत एकाच वेळी प्रकाशित करत आहेत.

या छोट्याश्या पुस्तकात 'चे' नं लिहिलेले दोन लेख आहेत. त्याच्या कार्याची ओळख करून देणारा लॅटिन अमेरिकन विदुषी मारिया कार्मेन यांचा एक लेख आहे. भारतात जन्मलेले, पाकिस्तानात वाढलेले आणि अमेरिकेत जगत्विख्यात झालेले थोर भारतीय विचारवंत ऐजाझ अहमद यांची अत्यंत विचारप्रवर्तक अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. नव्या मराठी पिढीला आपण छातीवर ज्याची प्रतिमा मिरवतो तो ब्रॅन्ड नेमका काय आहे, याची काही जाणीव व्हावी, यासाठी हे भाषांतर उपयोगी पडेल अशी आशा आहे.

**उदय नारकर**

# दोन शब्द

## अर्नेस्टो चे गव्हेरा: समाजवाद, नवा मानव आणि तिसरे जग

## मारिया देल कार्मेन अरिएत गार्सिया

'चे'च्या क्रांतिकारक जडणघडणीत १९६५ आणि १९६६ ही वर्षे अगदी कळीची ठरतात. ती दोन वर्षे ही एका कालखंडाचे शिखर गाठत असतानाच दुसऱ्याचा आरंभकालही होता. १९५९ मध्ये यशस्वी झालेली क्यूबन क्रांती आणि १९६५ मध्ये काँगो आणि बोलिव्हिया येथील क्रांतिकारक आंतरराष्ट्रीय मोहिमात सहभागी होण्यासाठी ठेवलेलं प्रस्थान या दरम्यानच्या काळात 'चे' ने बरेच महत्वाचे वैचारिक लिखाण केले होते. या लिखाणात तथाकथित तिसऱ्या जगात समाजवादाची बांधणी करण्याबाबतचे त्याचे विविधांगी विचार समाविष्ट होते. त्यामागे त्याने क्यूबात केलेले काम आणि पार पाडलेल्या जबाबदाऱ्यांचे मोठे पाठबळ होते. त्याचबरोबर त्याने समाजवादी जगाचा, विशेषतः सोव्हिएत युनियनचा, अनुभव आणि मार्क्स, एंगल्स व लेनिन यांच्या विचाराचा अतिशय खोलात जाऊन विचार केला होता. या काळातील अगणित लेखात-भाषणात 'चे'ने समाजवादी संक्रमण होत असताना उद्दिष्टे काय असावीत, कोणती कार्ये पार पाडावीत, मानवमुक्ती प्राप्त करण्यासाठी कोणती लक्ष्ये असावीत याविषयी प्रगल्भ चिंतन केले असल्याचे दिसून येते. या सर्वच लिखाणात त्याचे महत्त्वाचे सिद्धांत, विशेषतः गरीब आणि अविकसित देशांना स्वतंत्र आणि सार्वभौम होण्यासाठी काय करावे लागेल या विषयीचे सिद्धांत ग्रथित झालेले दिसतात. या विचारविश्वाचा केंद्रबिंदू आहे, शोषण आणि प्रभुत्व संपुष्टात आणण्यासाठी बदल करावयास सिद्ध झालेला नवा माणूस.

डिसेंबर १९६४ मध्ये त्याने युनोत केलेल्या भाषणाचे विश्लेषण केल्यास १९६५ च्या पहिल्या काही महिन्यांत त्याच्या कारकीर्दीचा एक टप्पा पूर्ण होऊन तो साऱ्या आफ्रिकेची यात्रा करायला सिद्ध होत असल्याचे दिसून येते. आफ्रिकेच्या या यात्रेच्या दरम्यान 'चे' विविध देशांच्या आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य आदोलनांच्या प्रमुख नेत्यांना भेटला. फेब्रुवारीत अल्जेरियात झालेल्या आफ्रो-आशियाई एकजुटीच्या दुसऱ्या आर्थिक चर्चासत्रात त्याने दिलेले भाषण कित्येकांना अतिशय धक्का देणारे आणि वादग्रस्त वाटले. आपल्या भाषणात त्याने तिसऱ्या जगाने पार पाडण्याच्या भूमिकेविषयी, त्याच्या भांडवलशाहीविरुद्धच्या लढाईची, समाजवादी देशांनी त्यांच्या राष्ट्रीय मुक्तिलढ्यांना पाठिंबा देणे का गरेजेचे आहे, याची अतिशय टोकदार आणि प्रखर मांडणी केली होती.

त्याची ही मांडणी कितीही वादग्रस्त ठरली असली आणि त्यावर कितीही टीका झालेली असली, तरी अलिकडच्या इतिहासाने ती खरी असल्याचेच दाखवून दिले आहे. समाजवादाच्या संरक्षणार्थ आवश्यक ती एकजूट नव्हती, त्यात सातत्य नव्हते, घेतल्या गेलेल्या भूमिका अतिशय धूसर आणि पोथीनिष्ठ होत्या हे आता दिसून आले आहे. 'चे'ने स्वीकारलेल्या मार्गाविषयी काही चिंतन केल्यास तो आता एक नवी वाट चोखाळू लागल्याचे स्पष्ट होते. जनतेच्या मुक्तिलढ्याच्या ज्वाला फुलवत असतानाच एकविसाव्या शतकातील माणूस कसा असावा या चिंतनाची कास

त्याने क्षणभरही सोडली नसल्याचे दिसून येते.

अल्जियर्समधील या छोटेखानी भाषणात मांडलेले विचारातच त्याने पुढे लिहिलेल्या 'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' (१९६५) आ णि 'त्रिखंडाला संदेश: दोन नव्हे, तीन नव्हे अनेकानेक व्हिएतनाम निर्माण करा' (१९६६) या संस्मरणीय निबंधांतील सिद्धान्तांची पायभरणी आढळून येते. यातील 'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' हा निबंध प्रथम प्रकाशित झाला उरुग्वेतील मार्चा या नियतकालिकात १२ मार्च १९६५ रोजी. तो त्याने अल्जियर्समध्ये असतानाच लिहिला होता. त्या वर्षीच्या एप्रिल ते नोव्हेंबरच्या दरम्यान 'चे' काँगोच्या मुक्तिलढ्यात सहभागी झाला होता. आपल्या सवयीनुसार त्याने 'काँगो डायरी: काँगोतील क्रांतियुद्धातील प्रसंग' या नावाची राजनिशी लिहिली. तो 'कटु अनुभव' असला तरी लढणाऱ्या जनतेच्या त्यागाचे प्रतिबिंब आणि मूल्य त्यात ग्रथित झाले आहे.

काँगोतून त्याने केलेले प्रयाण त्याच्या क्रांतिकारक वाटचालीतील एक निर्णायक वळण ठरले. एकाच वेळी मानसिक द्वंद्व आणि पर्यायाची शक्यता या अंतर्विरोधातून त्याने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला: लॅटिन अमेरिकेच्या संपूर्ण मुक्तीसाठी लढण्याचा. क्यूबाच्या बाहेर जाऊन लढायचा हा अनुभव काही सर्वस्वी नवीन नव्हता. फिडेलच्या नेतृत्वाखाली बाटिस्टाची हुकूमशाही उलथून टाकण्यासाठी मेक्सिकोत प्रशिक्षण घेत असतानाच, एकदा का क्यूबा मुक्त झाला, की जगाच्या त्या भागातील इतर देशांतही तो लढा सुरू करण्याचे वचन त्याने स्वतःला दिले होते.
पुढे चे गव्हेरा नावाचा क्रांतिकारक बनणार असलेल्या त्या तरूणाच्या जीवनाला १९५५ आणि १९५६ या दोन वर्षांनी मोठीच कलाटणी दिली होती. १९५९ मध्ये यशस्वी झालेल्या क्यूबन क्रांतीची पायाभरणी करणारा हा काळ ठरला. सुरवातीला 'चे'ने फिडेलचे नेतृत्व मनोमन स्वीकारत तो त्याचा पक्का अनुयायी बनला. पुढे त्याने केलेल्या अभ्यासातून, चिंतनातून आणि क्रांतिकारक चळवळीत प्रगल्भ होत गेलेल्या बांधिलकीतून त्याचे रूपांतर समाजवादी चे गव्हेरात झाले.

क्रांतीच्या कार्यात स्वतःला सर्वस्वी झोकून दिल्यामुळे अविकसित देशांना समाजवादी बनवण्याची, त्यांच्यातील अंतर्गत संघर्षातून वाट काढण्याची जबाबदारी त्याने आपल्या शिरावर घेतली. त्यातून अनेक नव्या दिशा खुल्या झाल्या आणि एका नव्या समाजाची पायाभरणी करण्याचे परिवर्तनशील काम त्याने आपल्या अंगावर घेतले. त्याने याविषयी केलेल्या योगदानातील दोन गोष्टी उठून दिसतात: १) समाजवादाची बांधणी करण्यासाठी निवडलेला मार्ग सातत्यपूर्ण बनवण्यासाठी करावयाच्या अभ्यासाप्रति कमालीची निष्ठा आणि २) क्यूबातील अनुभव ग्रथित करणारे त्याने केलेले सखोल चिंतन. जनतेच्या कल्याणासाठी आणि तिच्या सर्वंकष विकासासाठी झटू पहाणाऱ्या देशांसाठी हे चिमुकले बेट अत्यंत प्रेरक ठरणार होते.

त्या अनुभवाच्या आणि त्यासाठी केलेल्या व्यवहाराच्या जोरावरच त्याने क्यूबातून प्रयाण करण्यापू र्वी'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' हा महत्त्वपूर्ण निबंध लिहिला. क्यूबा सोडून गेला तरी त्याने आजवर छातीशी धरलेल्या एकाही तत्त्वाला तिलांजली दिली नाही. केवळ क्यूबन क्रांतीच यशस्वी करण्यासाठी नव्हे, तर इतर देशांनाही समाजावादाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी ती तत्त्वे मार्गदर्शक होती.

एखाद्या व्यक्तीने अंगिकारलेल्या कार्याचे कर्तेपण तिच्या माणूस असण्याशी एकजीव झालेले असते, हा विचार 'चे'च्या चिंतनाचा केंद्रबिंदू होता. तो विचार आणि त्यानुसार त्याने व्यतीत केलेले जीवन हा काही अपघात नव्हता. माणसाचे कर्तेपण त्याने जाणीवपूर्वक केलेल्या कृतीतून आणि भौतिक व्यवहारातून व्यक्त होत असते. येथे 'चे' मार्क्सने सुरवातीपासून दाखवलेल्या मार्गावरून वाटचाल करत होता. मार्क्सप्रमाणेच 'चे' ने आमूलाग्र परिवर्तनाची कास घट्ट पकडून ठेवली होती. कालबाह्य झालेल्या प्राचीन भांडवलशाहीची जागा घेणारी नवी सामाजिक रचना करण्याचे अनिवार्य पण अवाढव्य कार्य मार्क्सप्रमाणेच 'चे' नेही स्वीकारले होते.

हे ध्यानात घेता, 'चे' करत असलेले चिंतन समजून घेणे आणि ते जास्त आशयघन करत जाण्याची गरज

अधिकाधिक स्पष्ट होत जाते. त्या चिंतनात ऐतिहासिक स्मृतीला अनन्यसाधारण स्थान आहे. ही स्मृती भरती-ओहोटीच्या खळबळींनी संपृक्त असते. कोणत्याही बदलत जाणाऱ्या प्रक्रियेप्रमाणे तिच्यातही सुधारणा करणे शक्य असते. स्वतःला घडवत जग घडवणारा माणूस ज्याच्या केंद्रस्थानी आहे, असा हा प्रकल्प आहे. आणि हे कदापि विसरता येणार नाही. 'चे' आपल्याला वारंवार हेच सांगत असतो.

पुढचे मार्गक्रमण आणि संभाव्य उत्तरे याच उन्नत स्तरावर आढळून येतील. कितीही अवघड वाटले, तरी माणसांनाच माणसांना नायक म्हणून घडवलेच पाहिजे. परंतु, सर्वंकष आणि आमूलाग्र परिवर्तनाचे सक्षम साधन म्हणूनच ते घडले पाहिजेत. हे काम अतिशय जटील तर आहेच, पण कमालीचे थकवणारेदेखील आहे. ते माणसाच्या तात्कालिक क्षमतांच्या बाहेरचेही असते. पण माणसाची ही विकसनशील क्षमता आपल्याला सामुदायिकपणे घडवावीच लागेल.

हा नवा माणूस कसा घडवायचा आणि हा प्रकल्प शक्यतेच्या कोटीतील आहे, असे इतरांना पटवून द्यायचे, हेच 'चे'च्या विचाराचे अंतिम क्षितिज होते. तथापि, लोकांना शोषणात आणि अतिशय तुटपुंज्या साधनांवर जगावे लागते अशी कठीण परिस्थिती आहे, जगाचे कानेकोपरे अंधाराने खचाखच भरले आहेत, हे वास्तव त्याने कधीच नजरेआड केले नाही. या साऱ्या जंजाळातूनही माणूस कसा उभारी धरतो, तो कसा आपले जग स्वतःच्या कल्पनेनुसार, गरजेनुसार उभे करतो याचे उदाहरण आहे, अवलंबित्वाच्या आणि अविकसनाच्या अवस्थेतही समाजवाद निर्माण केलेल्या क्यूबाचे. खऱ्याखुऱ्या आमूलाग्र परिवर्तनाच्या लढाईसाठी सिद्ध होणारे तथाकथित 'तिसरे जग' हेच 'चे'साठी बनले अस्सल लक्ष्य. जनतेची जाणीव पुरेश्या प्रमाणात जागी करता आली तर विजय दृष्टिपथात येतो, हे मर्म त्याला समजले होते. हे मार्ग सोपा नाही, अजिबात सोपा नाही याची त्याला पक्की जाणीव होती. पण अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या शक्ती कोणत्या हे ओळखल्यास आपण आपल्या साध्याच्या दिशेने, नव्या सत्तेला प्रभुत्वस्थानी आणण्याच्या दिशेने कूच करू शकतो. 'चे'ने अल्जियर्समध्ये व्यक्त केले होते, आणि काँगो आणि बोलिव्हियात तो करू पाहत होता, ते हेच. शेवटी 'चे' ची ज्या बोलिव्हियात हत्त्या करण्यात आली, त्या भूमीतही त्याच्या विचाराचे बी आपले भवितव्य उज्ज्वल करण्याची, एक नवे चांगले जग घडवण्याची क्षमता विकसित करणाऱ्या माणसात अंकुरण्याची प्रतिक्षा करत आहे.

जगातल्या वंचितांना एकत्र करू पाहणाऱ्या 'त्रिखंडाला संदेश' या निबंधाचा गाभा हाच आहे. त्याच्या काळातील अतिशय पाशवी युद्धाला दिलेली ती प्रतिक्रिया आहेच, त्याचबरोबर आपल्या प्रतिष्ठेसाठी आणि सर्वंकष मुक्तीसाठी लढण्यास उद्युक्त असलेल्या मानवाच्या आंतरिक ऊर्मींची अभिव्यक्तीदेखील आहे.

मानवतेला पत्करावी लागलेली ऐतिहासिक पीछेहाट ही एक व्याकूळ करणारी शोककथा आहे. 'चे' सारख्या लोकांवर आणि त्यांच्या विचारांवर नुसते हल्लेच नव्हे, तर त्यांना नष्ट करण्याचे जोरदार प्रयत्न केले जात आहेत. तरीदेखील, 'चे'चे विचार आणि त्याचे कार्य आपल्या नव्या युगाचे अंगभूत घटक बनले आहेत. या पुस्तकात पुनर्प्रकाशित केलेले लेख पुन्हा अभ्यासण्यासाठी, त्यापासून शिकण्यासाठी वरील कारण पुरेसे आहे. 'क्यूबातील समाजवाद आणि माणूस' आणि 'त्रिखंडाला संदेश' हे दोन्ही निबंध एकमेकांना पूरकच आहेत. मानवतेला केंद्र मानून सुरू झालेली लढाई प्रखर करण्यासाठी, तिला विजयी करण्यासाठी आणि मानवाची आत्मिक उन्नती हेच जिचे अंतिम उद्दिष्ट आहे, ही प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठीच ते लिहिले होते. तो एका नव्या आणि संभाव्य रणनीतीचा आरंभबिंदू आहे, परिघावर जगणाऱ्या देशांतील बलशाली शक्तीचा आविष्कार आहे. 'चे'च्या शब्दातच सांगायचे तर, जेथे मानवमुक्तीच्या दुंदुभि आसमंत दणाणून सोडतील, असे भवितव्य उभारू पाहणारी दुर्दम्य इच्छाशक्ती घडवत राहणे, हेच तर आपले काम आहे.

* * *

# प्रस्तावना
## ऐजाझ अहमद

"मानवता हीच मातृभूमी"
**जोसे मार्ती**

"२१ व्या शतकातील माणूस घडवू या - आपण आपल्या हातांनीच."
**चे गव्हेरा**

अर्नेस्टो 'चे' गव्हेरा (१९२८-१९६७) चे हे दोन अभिजात दर्जाचे लेख आपण प्रकाशित करत आहोत. 'चे' गव्हेरा हा मनुष्य भविष्यात जगला. भांडवल आणि साम्राज्य यांनी घडवलेल्या जगाशी कायमचा विद्रोह करत जगला. अशा जगाचं क्रांतिकारक परिवर्तन करणारा सैनिक म्हणून जगला. त्याचं लिखाण समजून घेताना आपल्याला एक मोठी समस्या भेडसावते. तो आपल्याहून अत्यंत भिन्न अशा ऐतिहासिक काळात जगला. त्याच्या काळात सुमारे एक तृतियांश मानव समाजवादी देशांत रहात होता. तो भांडवलशाही आणि कम्युनिझम, साम्यवाद, या दोन जागतिक व्यवस्थांच्या दरम्यान रात्रंदिवस चालणाऱ्या युद्धाचा काळ. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या तीन खंडात, या त्रिखंडात, राष्ट्रीय मुक्तीलढे पेटलेले होते. हे होते, म्हटले तर, साम्राज्यवादविरोधी त्यागमय, गौरवशाली लढ्याचे युग. कोट्यावधी, अगणित लोकांना दिसत होती त्यातील क्रांतिकारी राष्ट्रवाद आणि साम्यवाद यांची आंतरिक घट्ट वीण. त्यामुळे 'चे' गव्हेराचे लिखाण हा जणू क्रांतिकारी भूतकाळातून क्रांतिकारी भविष्याकडे वाहत असलेल्या प्रवाहात सोडून दिलेल्या बाटलीतला संदेशच होता. तो संदेश आता आपल्या हाती लागला आहे.

साम्राज्यवादाने आणि त्याच्या हस्तकांनी त्याची हत्त्या केली, तेव्हा 'चे' होता अवघा ३९ वर्षांचा. अनेक जणांच्या जीवनाची ऊर्जा सामावून वेगाने आकाशात भ्रमण करणारा तो ताराच होता. तो प्रशिक्षित डॉक्टर होता पण शिक्षण घेत असताना, विद्यार्थीदिशेतच त्याने अख्खी लॅटिन अमेरिका पालथी घातली होती. अर्जेंटिनात जन्मलेल्या 'चे' ने मार्क्सवादाची बाराखडी गिरवली ग्वाटेमालामध्ये, १९५४ साली. तिथेच त्याने साम्राज्यवादाविरुद्ध लढण्यासाठी स्वेच्छेने हातात शस्त्र घेतले. सीआयए ने आर्बेन्झचे प्रागतिक सरकार मारेकऱ्यांच्या साह्याने बंड करून उलथवून टाकले होते. ते बंड मोडून काढण्यासाठी डॉक्टर असलेल्या 'चे' ने हाती शस्त्र घेतले. तेथून तो मेक्सिकोत निसटून गेला आणि तिथे त्याची फिडेलशी भेट झाली. पहिल्या भेटीतच फिडेलचा विश्वास संपादन करून त्याने क्यूबाच्या क्रांतीशी आयुष्यभराची बांधिलकी पत्करली. देशाच्या बाहेरून लढणाऱ्या क्रांतिकारकांच्या पथकात तो डॉक्टर म्हणून सामील झाला. पण थोड्याच अवधीत बंडखोर लष्कराचा आघाडीचा कमांडर बनला. इतकेच नव्हे, तर तो जिवंतपणीच गनिमी युद्धतंत्रातील एक दंतकथा बनून गेला.

क्रांतीनंतर 'चे'ने क्रांतिकारी सरकारमध्ये विविध जबाबदाऱ्या स्वीकारल्या. नॅशनल बॅंकेचा अध्यक्ष, उद्योग मंत्री म्हणून काम तर केलेच; पण युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील देशोदेशींच्या राजधान्यांत क्यूबाचा सतत भटकणारा राजदूत, अल्जिअर्स ते न्यू यॉर्कपर्यंतच्या अगणित आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरील क्यूबाचा प्रवक्ता म्हणूनही अथक श्रमत राहिला. यातील काही भेटी व्यापार आणि राजनैतिक करारांसाठी केलेल्या खुल्या आणि अधिकृत असायच्या; आणि त्यातूनच सोव्हिएत युनियन आणि समाजवादी देशांसोबत क्यूबाचे बहुआयामी संबंध प्रस्थापित होऊन दृढ झाले. तर काही भेटी या साम्राज्यवादाविरुद्ध ठिकठिकाणी विविध क्रांतिकारी आघाड्या खोलण्यासाठी गुप्तपणे दिलेल्या असायच्या. त्यापैकी बोलिव्हियात क्रांतिकारी युद्ध छेडण्यासाठी दिलेली भेट सर्वात महत्त्वाकांक्षी होतीच, पण ती अखेरचीही ठरली. त्याचा उद्देश बोलिव्हियापुरता मर्यादित नव्हता. तेथून क्रांती अर्जेंटिनामध्ये पसरवायची होती. पण ती भेटच दुर्दैवी ठरली. त्याच्या गनिमी लढाईसाठी उभारलेल्या तळावर सीआयएच्या नेतृत्वाखालील बोलिव्हियन सैन्याच्या तुकडीने हल्ला करून तो उध्वस्त तर केलाच, पण त्यातच 'चे' ची निर्घृण हत्त्या करण्यात आली.

एक अतिशय खळबळजनक आणि चित्तथरारक घडामोडींनी भरलेलं कृतीशील क्रांतिकारकारकाचं आयुष्य तर 'चे' जगलाच, पण तो आपल्या पाठीमागे समृद्ध असा वैचारिक वारसादेखील ठेवून गेला आहे. त्यातील बरेच लिखाण स्पॅनिशमध्ये असून ते अजून इतर भाषांमध्ये अनुवादित झालेले नाही. त्याची जबरदस्त चिकित्सक अभ्यासू वृत्ती आणि तीक्ष्ण बुद्धिमत्तेची झलक दाखवणारे दोन लेख आपण या पुस्तिकेत प्रकाशित करत आहोत. दोन्ही लेख विशिष्ट हेतूने लिहिलेले असल्याने त्यातील आशयाला त्या उद्दिष्टाची चौकट लाभली आहे. पण त्यात समाविष्ट असलेल्या ऊर्जस्वल कल्पना आणि विचारांचे त्याच्या विचारसरणीत कित्येक वर्षे थैमान चालू होते आणि त्यांची बीजे आधीच्या कित्येक लेखांत आणि भाषणांत आढळून येतात. 'बंडखोर लष्कराचे सामाजिक आदर्श' (१९५९), 'क्यूबा: ऐतिहासिक अपवाद की वसाहतवादविरोधी लढ्यातील अग्रदल?' (१९६१), 'क्रांतिकारक डॉक्टर' (१९६०), 'तरूण कम्युनिस्ट बनताना' (१९६२) हे आणि इतर कित्येक लेख आणि भाषणे अतिशय संस्मरणीय ठरले आहेत. त्याविषयी खूप बोलले गेले आहे आणि पुढेही बोलले जाणार आहे.

आपण त्याच्या 'त्रिखंडाला दिलेला संदेश' या लेखापासून सुरूवात करू या. क्यूबाने आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देशांची एक 'त्रिखंड परिषद' भरवण्यात पुढाकार घेतला होता. ३ ते १५ जानेवारी १९६६ च्या दरम्यान हवानामध्ये. त्या परिषदेत ८२ देशांतून ५१२ प्रतिनिधी आणि २७० अभ्यागत एकत्रित आले होते. १५ जानेवारी या परिषदेच्या अखेरच्या दिवशी OSPAAAL ही आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील जनतेच्या एकजुटीची संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेने तिन्ही खंडांच्या कानाकोपऱ्यात चालू असलेल्या साम्राज्यशाहीविरोधी लढायांच्या बातम्या जगातील जनतेपर्यंत पोचवण्यासाठी 'ट्रायकॉन्टिनेन्टल', म्हणजे 'त्रिखंड', हे बुलेटिन सुरू केले. शोषित आणि दडपलेल्या देशांतील साम्राज्यवादविरोधी विचारवंतांच्या लिखाणाचे ते व्यासपीठच बनले.

या पहिल्या त्रिखंड परिषदेच्या संघटन समितीचे अध्यक्षस्थान भूषवले होते, मोरोक्कोच्या मेहदी बेन बर्का या महान मार्क्सवादी साम्राज्यवादविरोधी नेत्याने. परिषदेचे महत्त्व विषद करताना ते म्हणाले,

“साम्राज्यशाहीविरोधी संघटनांची हवाना येथील ही बैठक अनेक अर्थांनी ऐतिहासिक आहे. कारण ती सहमती आणि एकजुटीची निदर्शक आहे; जागतिक क्रांतीच्या समाजवादी ऑक्टोबर आणि तिसऱ्या जगातील राष्ट्रीय मुक्तीलढा या दोन समकालीन विस्तीर्ण प्रवाहांचा तो संगम आहे; आणि या दोन्ही क्रांत्यांची मूस असलेल्या क्यूबात ती भरत आहे.”

आपल्या युगातील साम्यवाद आणि साम्राज्यवादविरोध हे सूत्र घेऊनच या दोन प्रवाहांतील द्वंद्वात्मक नात्यांवर चे गव्हेराने केलेले विचारमंथन आपल्याला या दोन लेखात आढळून येईल.

हवाना येथे ही परिषद होत असताना 'चे' आफ्रिकेतील क्रांतिकारी लढ्याच्या मोहिमेत आकंठ बुडालेला होता. त्याने आपला संदेश या परिषदेसाठी नव्हे, तर वरील नियतकालिकाच्या १६ एप्रिल १९६७ रोजी निघालेल्या शुभारंभाच्या अंकासाठी लिहिला होता. त्या लेखाला स्वतः 'चे'ने दिलेले शीर्षक होते: "दोन नव्हे, तीन नव्हे . . . अनेकानेक व्हिएतनाम: हाच आपला परवलीचा शब्द". दुसरा लेख होता मार्च १९६५ रोजी *मार्चा* या युरुग्वेच्या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला, 'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' हा.

'त्रिखंडाला संदेश' या लेखात भांडवल आणि साम्राज्यवादाला मूठमाती देण्यासाठी जागतिक क्रांतिकारी उठावासाठी शस्त्र हातात घ्या, अशी हाक त्याने दिली होती. ही हाक देताना तो म्हणतो: "साम्राज्यशाही ही भांडवलशाहीची अंतिम अवस्था असून ती जागतिक व्यवस्था आहे. त्यामुळे जागतिक लढाईच तिचा पराभव करू शकेल. . . चला, खरा कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवाद उभा करू या. चला, कामगारवर्गाचे सैन्य उभे करू या." दुसऱ्या 'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' या लेखात क्यूबातील क्रांतिकारी बदलावर चिंतन आहेच, पण त्याच बरोबर कम्युनिझमचा, साम्यवादाचा अर्थ काय यावरील सखोल मननही आहे. साम्यवादामुळे उत्पादन व्यवस्था आणि वर्गसंबंध यांच्यात मूलभूत परिवर्तन होतेच, परंतु मुख्यतः माणसात आमूलाग्र परिवर्तन होते. 'चे' म्हणतो, "क्रांतिकारकांची सर्वोच्च आकांक्षा असते: आपल्या परात्मतेतून मानव मुक्त झाला आहे, हे पाहण्याची . . . सामाजिक जीव म्हणून व्यक्तीला सर्वंकष जाणीव प्राप्त होईल, परात्मतेचे साखळदंड तुटले की मानवतेचा संपूर्ण परिपोष होईल. मुक्त झालेल्या श्रमशक्तीद्वारा खऱ्या मानवी स्वभावाची पुनर्स्थापना होईल." यातील काही परिच्छेद वाचताना 'चे' जणू मार्क्सच्या १८४४ च्या संहितेतील काही परिच्छेदांचे पुनर्लेखनच करत असल्याचा भास होतो. ते नुसते पुनर्लेखन नाही, तर त्याविषयी एक आग्रहही जाणवतो, ते स्वप्न याचि देही पाहण्याचा. ते आव्हान तातडीने स्वीकारून साध्य करण्याचा आग्रह. ते प्रत्यक्षात आणण्याची शक्यता क्यूबन क्रांतीने खुली केली आहे, आणि ती शक्यता त्रिखंडातील मुक्तिलढ्यांच्या रूपात साकारत आहे, याची त्याला खात्री आहे.

'त्रिखंडाला संदेश'ची सुरूवातच शांततेविषयीच्या चिंतनाने होते. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाची अखेर झाल्यानंतरच्या वीस वर्षात गोडवे गायल्या गेलेल्या तथाकथित 'शांततामय सहअस्तित्वाच्या' संकल्पनेवर, तिचा थेट उल्लेखही न करता, तो कडाडून हल्ला चढवतो. अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांच्या दरम्यान युद्ध झाले नाही, याची नोंद घेत असतानाच लेखाच्या आरंभीच्या काही परिच्छेदातच एका अध्याहृत प्रश्नाची त्याने चर्चा केली आहे: दोन महासत्तांमध्ये थेट युद्ध झालेले नाही म्हणजे खरोखरच जगात 'शांतता' आणि 'शांततामय सहअस्तित्व' नांदते आहे काय? हा प्रश्न तो विचारतो. इतकेच नव्हे, तर त्याहीपुढे जाऊन त्याने विचारलेला प्रश्न आहे, साम्राज्यवादाशी 'शांततामय सहअस्तित्व' राखणे खरोखर शक्य आहे का? साम्राज्यशाही हीच या जगावर कायमचे युद्ध लादणारी शक्ती नाही काय? त्यासाठीच आपल्या लेखाच्या आरंभीच तो दुसऱ्या महायुद्धानंतर लगेच सुरू झालेल्या कोरियन युद्धाची चर्चा करतो. त्याच्याच शब्दात सांगायचे, तर ' युनोचा बदनाम झेंडा हातात नाचवत अमेरिकेच्या लष्करी नेतृत्वाखाली डझनभर देशांनी कोरियावर आक्रमण केले.' त्या युद्धात अमेरिकेने आपले वीस लाख सैनिक तैनात केले होते, ६,३५,००० टन वजनाचे बॉंब टाकले होते, त्यात ३२,५५७ टन वजनाचे नापाम हे विषारी बॉंब होते! व्हिएतनामविषयीच्या चिंतनाच्या सुरूवातीलाच 'चे' त्या देशाला तीन खंडांतील फ्रान्स, जपान आणि अमेरिका या तीन साम्राज्यवादी देशांशी युद्ध करावे लागल्याची नोंद घेतो. दुसऱ्या महायुद्धात सर्व देशांनी जेवढ्या वजनाचे बॉंब वापरले त्याहून जास्त वजनाचे बॉंब अमेरिकेने व्हिएतनामवर टाकल्याची आपण नोंद घेतली पाहिजे. इंडो-चीनचा परिसर हा त्या काळातील अंतर्विरोधाचा केंद्रबिंदू असला, तरी दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या जगभरच्या दडपशाहीची उदाहरणे म्हणूनच 'चे' कोरिया आणि व्हिएतनाम यांचा उल्लेख करतो. खरे तर, अमेरिका आणि तिची मित्र राष्ट्रे देशोदेशांवर करत असलेली बेमुर्वत आक्रमणे पाहता, त्यांच्या युद्धखोरीने जणू तिसरे महायुद्धच छेडल्यासारखे होते. दोन महासत्तांच्या शांततामय सहअस्तित्वाच्या कालखंडात हे तिसऱ्या जगावर लादलेले युद्ध होते.

'चे' चा हा युक्तिवाद म्हणजे तत्कालीन समाजवादी जगाचे पुढारपण करणाऱ्या देशांवरील सूचक पण प्रखर

वैचारिक हल्लाच होता. ते देश व्हिएतनामच्या पाठीशी उभे रहायला अपुरे पडले होते, याची ती नोंद होतीच; तसेच, या साम्राज्यवादी युद्धाच्या काळात झालेल्या चीन-सोव्हिएत दुफळीमुळे निर्माण झालेल्या भयानक परिणामांची चिकित्साही होती. कुणा एका घटकाला उद्देशून न करता 'चे' जणू त्यांची कानउघाडणी करण्यासाठीच एक सर्वसाधारण सल्ला देतो: “आक्रमणाला बळी पडलेल्यांना आपण सुयश चिंततो की नाही, हा प्रश्न गैरलागू आहे. आपण त्याचे भागधेय आपलेही मानतो का मानत नाही हा मुद्दा आहे. मृत्यू येवो अथवा यश, आपण त्याला अखेरपर्यंत साथ दिली पाहिजे.” हाच मुद्दा आणखी विशद करताना तो म्हणतो:

“अमेरिकन साम्राज्यवाद स्वभावतःच आक्रमक आहे. त्याची महाभयानक गुन्हेगारी कृत्यं जगभरात ठायी ठायी दिसत आहेत. मित्रांनो, तो गुन्हेगार आहे, हे आपल्याला ठाऊक आहेच. पण गरज पडली तेव्हा व्हिएतनामला समाजवादी जगाचा अतूट हिस्सा करण्यात चालढकल केलेल्यांच्या अपराधाचं काय? जागतिक युध्द पेटण्याचा धोका होता, हे खरंच; पण साम्राज्यवादालादेखील काही निर्णय घेणं भाग पडलं असतंच की. एकमेकांना शिवीगाळ करत आणि दुसऱ्याला अडकवण्यासाठी सापळे रचत भांडणाऱ्यांच्या पारड्यातही अपराधाचं माप टाकायला हवंच – जे भांडण समाजवादी जगाच्या दोन बड्या सत्तांनी बऱ्याच दिवसांपासून चालवलं आहे.

आपण एका प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर दिलं पाहिजे: व्हिएतनाम एकाकी पडलाय, की नाही? एकमेकांशी भांडणाऱ्या दोन शक्तींच्या मध्ये तोल सावरत राहायची कसरत त्याला करावी लागतेय, की नाही?”

दोन भांडणाऱ्या सत्ता म्हणजे सोव्हिएत युनियन आणि चीन हे उघड आहे. त्यांच्यात निर्माण झालेल्या दुफळीमुळे जागतिक कम्युनिस्ट चळवळच कमजोर झाली. ही केवळ 'चे' याची भूमिका नव्हती. त्याआधी हवाना विद्यापीठाच्या प्रांगणात १९६५ मध्ये बोलताना फिडेल म्हणाला होता:

“ . . . समाजवादी कुटुंबाच्या अंतरंगात पडलेली दुफळी अगदी उत्तर व्हिएतनामवर हल्ले होत असूनही सांधली गेलेली नाही. ही दुफळी साम्राज्यशाहीच्या पथ्यावर पडत आहे, याविषयी कुणाला संशय आहे काय? साम्राज्यवादी शत्रूच्या विरोधात संयुक्त आघाडी झाली असती, तर जगाच्या त्या भागात हल्ले आणि हस्तक्षेप करायचं त्यांना धाडस झालं नसतं, याविषयीही कुणाला संशय आहे काय?”

खुद्द क्यूबाला जरी अमेरिकन साम्राज्यशाहीपासून थेट आणि भयंकर धोका असला, तरी एका भ्रातृभावी समाजवादी देशावर योग्य आणि आवश्यक टीका करण्याने एकजुटीला छेद जायचे कारण नाही, या विषयी फिडेल आणि चे यांच्या मनात बिलकूल शंका नव्हती. आक्रमणाचा बळी असलेल्या देशाशी एकजूट दाखवण्यातून त्याच्याविषयी आत्मभाव व्यक्त होतोच, परंतु त्याच्या लढ्यात उतरून त्याचे भागधेयही आपल्या शिरावर घ्यायची तयारी हवी; व्हिएतनामचे संरक्षण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर साम्राज्यशाहीचा पराभव करण्यासाठी "साम्राज्यवादी शत्रूविरुद्ध संयुक्त आघाडी" करणे गरजेचे आहे, यावर 'चे' आणि फिडेल यांचे ठाम एकमत होते. त्यातूनच 'चे' ने त्रिखंडाला दिलेल्या संदेशाचे आशयसूत्र सिद्ध झाले: 'दोन, तीन . . . अनेकानेक व्हिएतनाम' निर्माण करण्याचा आग्रह. त्रिखंड परिषदेचा आणि तिने निर्माण केलेल्या संस्थांचा उद्देशही तोच होता: या तीन खंडात साम्राज्यशाहीविरुद्ध सशस्त्र लढा उभारण्याची व्यूहरचना. त्यामुळे साम्राज्यवाद्यांना आपले सैन्य जगात ठिकठिकाणी विखरून टाकावे लागले असते; त्यांची अर्थव्यवस्था धोक्यात येईल इतकी युद्धाची किंमत त्यांना मोजावी लागली असती; आणि परिणामी क्रांतीच्या शक्तीपुढे गुडघे टेकायची साम्राज्यशाहीवर पाळी आली असती. अर्थात, हे आव्हान काही सोपे नाही, याची त्यांना स्पष्ट जाणीव होती. साम्राज्यशाहीविरोधी आघाड्यांना मृत्यू आणि शोकांतिकांना सामोरे जावे लागले असतेच. हे विचार केवळ 'चे'पुरते मर्यादित नव्हते. त्रिखंड परिषदेच्या समारोपाच्या भाषणात फिडेल हेच म्हणाला होता: “क्यूबन क्रांतिकारकांसाठी साम्राज्यशाहीशी लढण्यासाठी जग हीच रणभूमी आहे . . . जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात लढणाऱ्या क्रांतिकारक आंदोलकांच्या खांद्याला खांदा लावून लढण्यासाठी हाक दिल्यास क्यूबन योद्धे तिला प्रतिसाद देतील. . . हवाना जाहीरनामा म्हणतो त्याप्रमाणे क्रांती करणे हेच प्रत्येक क्रांतिकारकाचे कर्तव्य आहे आणि ते नुसत्या शब्दांत व्यक्त

करून नव्हे, तर कृतीत उतरले पाहिजे."

अशी आघाडी उघडण्यासाठी बोलिव्हियाला प्रस्थान ठेवत असतानाच 'चे'ने हे लेख लिहिलेले आहेत. आपल्या विचारांसाठी आपण आपले प्राण पणाला लावत आहोत, याची त्याला स्पष्ट जाणीव होती. त्यामुळे त्याचा शेवटही एखाद्या मृत्यूगीतात शोभणारा आहे. उघड्या डोळ्यांनी मृत्यू कवटाळण्यासाठीच तो निघाला होता. त्याची पूर्वसूचना त्याने खालील शब्दांत व्यक्त केली आहे:

"जेव्हा केव्हा आपण आपलं रक्त शिंपून आपल्याश्र्या केलेल्या भूमीवर अखेरचा श्वास घेऊ, तेव्हा आम्ही हे व्रत अंधपणे स्वीकारलं नव्हतं, आम्ही स्वतःला कामगारवर्गाच्या महान सैन्यातील शिपाईच समजतो हे जगाला ओरडून सांगू . . . आमची हरेक कृती ही साम्राज्यशाहीविरुद्ध वाजवलेली दुंदुभीच असेल, अमेरिका या मानवतेच्या जिवावर उठलेल्या शत्रूविरुद्ध जनतेनं उभारलेल्या एकजुटीचा पोवाडा असेल. जेव्हा केव्हा युद्ध दत्त म्हणून आमच्यासमोर उभं ठाकेल तेव्हा आम्ही त्याचं स्वागतच करू, पण तेही आमच्या युद्धगर्जना स्वागतशील कानावर पडल्या आहेत आणि नवनवे हात आमच्या हातातील शस्त्र घ्यायला उत्सुक झाले आहेत, नवनवे सैनिक मशिनगनच्या लयीवर उच्चरवात मृत्यूगीत गाऊ लागले आहेत, आसमंत भेदणारे विजयघोष करू लागले आहेत याची खातरजमा करूनच."

"समाजवाद आणि क्यूबातील माणूस' या आपल्या दुसऱ्या लेखाच्या सुरुवातीला क्यूबातील क्रांतीच्या बांधणीचा काही तपशील 'चे' मांडतो. आणि ती मांडणी दोन पानातच संपवतो. लेखाच्या उर्वरीत सर्व भागात तो क्रांतिकारी प्रकल्पाच्या गाभ्याविषयी, म्हणजे साम्यवादाविषयी, कम्युनिझमविषयी,  सखोल चर्चा करतो. आधीच्या काही लेखांमध्ये 'चे' ने क्यूबन क्रांती आणि मार्क्सवाद यांच्यातील नात्याची एक अनोखी मांडणी केलेली आढळते. 'पहिल्या लॅटिन अमेरिकन युवा परिषदे"पुढील भाषणात तो म्हणतो:

". . . ही क्रांती मार्क्सवादी आहे असे म्हणायचे असेल – आणि नीट ऐका, मी मार्क्सवादी म्हणतोय – तर ते केवळ मार्क्सने दाखवलेला मार्ग क्रांतीला स्वतःच्या अनुभवातून, स्वतः विकसित केलेल्या पद्धतीतून सापडला, म्हणून. आम्ही इथे व्यवहारात राबवत आहोत तो मार्क्सवाद असेल तर तो आम्हाला इथेच आढळला आहे, म्हणून तो मार्क्सवाद आहे. त्या काळात माओ त्से तुंग याची एक पुस्तिका आमच्या हाती पडली. (आणि आमच्या लक्षात आलं), गनिमी युद्धाविषयी आजवर जे लिहिलेलं आहे, ते (न वाचताही) लोकांनी आचरणात आणले होते. त्यांनी आपले गनिमी युद्धतंत्र शत्रूपासून शिकून विकसित केले होते. हुकूमशाही वापरत असलेले तंत्र समजून घेऊन त्यांनी आपले तंत्र विकसित करून आत्मसात केले होते."

आपल्या 'क्यूबन क्रांतीच्या विचारसरणीविषयी नोंदी' या लेखामध्ये तो लिहितो:

"आपण सक्रिय क्रांतिकारक लढे उभे करत असताना शास्त्रज्ञ मार्क्सने सांगितलेल्या नियमांनुसारच प्रत्यक्ष व्यवहार करत असतो. क्रांतीच्या मार्गावरून वाटचाल करत असताना आपण केवळ शास्त्रीय मार्क्सने केलेल्या भाकीतानुसारच कृती करत असतो. क्यूबन क्रांतीचे नेते काय दावा करतात, सैद्धांतिक दृष्टीकोनातून ते हे क्रांतीचे नियम पाहतात की नाही याच्या निरपेक्ष रीतीने त्या घटना-प्रसंगांमध्ये मार्क्सवादाचे नियम कार्यरत असतातच . ."

हे परिच्छेद असाधारणरित्या मर्मग्राही आहेत. कामगारवर्गीय क्रांतीचा मार्क्सवादी सिद्धांत  ठाऊक नसतानाही कृती करणारे 'चे', फिडेल आणि त्यांचे सहकारी 'व्यावहारिक क्रांतिकारक' होते; तसेच, माओच्या गनिमी युद्धाच्या सिद्धांताविषयी पूर्ण अनभिज्ञ असूनही गनिमी काव्याने लढणारे सैन्य उभे करून अजाणता कामगारवर्गीय क्रांतीच घडवून आणत होते. किंवा त्यांच्या क्रांतिकारी व्यवहारानेच त्यांना मार्क्सवादी सिद्धांताचे वस्तुनिष्ठ सत्य प्रतीत झाले, असे म्हणता येईल. विकसित भांडवली विकासाच्या सर्व शक्यता संपल्या आणि ती अंतर्विरोधांनी पूर्णतः विद्ध झाल्यावरच क्रांती शक्य होते, या मार्क्सच्या सिद्धांताला चिकटून राहिल्याबद्दल 'चे'  पाश्चात्य मार्क्सवाद्यांना

'समाजवाद आणि क्यूबातील माणूस' मध्ये दोष देतो. त्याचवेळी लेनिनने या संकल्पनेच्या जागी साम्राज्यशाही आणि तिच्या साखळीतील कमजोर दुव्याचा सिद्धांत प्रस्थापित केला होता, याची तो खास नोंद घेतो. याचा अर्थ यापुढे समाजवादी क्रांती विकसित भांडवली देशांऐवजी शोषित-पीडित देशांमध्ये होण्याची शक्यता जास्त आहे. परंतु त्याच बरोबर गरीब, पीडित अशा क्यूबासारख्या देशाने क्रांती केल्यानंतर त्याला प्रगत पाश्चात्य देशांना गाठण्यासाठी 'समाजवादी प्राथमिक संचया'चे धोरण राबवणे भाग आहे का? की त्याला दुसरा काही मार्ग स्वीकारावा लागेल? हे प्रश्न महत्त्वाचे होते.

'चे'च्या या लेखांतील युक्तिवादानुसार त्रिखंडातील क्रांत्यांना एक आव्हान स्वीकारावे लागेल: फारसा औद्योगिक विकास आणि म्हणावी तशी ऐहिक समृद्धी नसतानाही चांगल्या दर्जाचे, समतानिष्ठ आणि सभ्य समाज उभारणे शक्य आहे. आपल्या पारंपरिक समजानुसार उत्पादनाच्या शक्ती आणि संबंध हे मूलभूतरित्या बदलता येतीलच. जनतेच्या ऐहिक सुरक्षिततेसाठी, अत्यावश्यक सुखसोयींसाठी आणि बौद्धिक विकासासाठी ते आवश्यक आहेच. पण भांडवलशाहीमुळे खुंटलेल्या, वाढ खुंटून विकृत अथवा नष्ट केलेल्या पण एक समाजवादी मानवी समाज उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत स्वाभाविक अशा मानवी क्षमता पुनर्प्राप्त करण्यासाठीही हा बदल आवश्यक आहे. या दृष्टीने पाहू जाता मानवी स्वभाव विकृत करणे, हा साम्राज्यवादाचा घोर अपराध आहे. तो त्याचा अंगभूत दोष आहे. मानवी स्वभावात दुसऱ्याप्रति एक उपजत आत्मीयता, खुलेपणा असतो. हा उपजत गुण साम्राज्यशाही दडपते. त्याजागी आत्मकेंद्री, आधाशी आणि इतरांच्या सुखदुःखाप्रति आस्था नसलेली व्यक्ती निर्माण करते. सामाजिक माणसाच्या जागी एकमेकांशी कसलाही आत्मभाव नसलेल्या, त्यांच्याविषयी परकेपणा बाळगणाऱ्या व्यक्तींचा जमाव निर्माण करते. ज्याला 'चे' 'नवा पुरूष आणि नवी स्त्री' म्हणतो, अशा अपरात्म व्यक्तींच्या मानुष समाजाची धारणा करणे, हे समाजवादी व्यवस्थेपुढील मध्यवर्ती कार्य आहे. व्यक्तींना ऐहिक सुरक्षिततेचा आधार नसल्यास व्यक्तीव्यक्तींमध्ये, एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीशी नैतिक संबंध प्रस्थापित होणे, प्रस्थापित झाल्यास ते टिकणे दुरापास्त असते, याची 'चे' गव्हेराला एका बाजूला जाणीव होती. त्यामुळे आरोग्य, शिक्षण, पोषण या बाबी प्रत्येक व्यक्तीला समान प्रमाणात उपलब्ध होणे क्रमप्राप्त असते. क्यूबन समाजाच्या बांधणीत यावर कटाक्ष ठेवण्यात आलाच. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय भ्रातृभाव, एकजूट आणि उत्तरदायित्व यांची कासही सोडायची नाही असा क्यूबाचा निश्चय आहे. 'चे' गव्हेराची मर्मदृष्टी म्हणजे राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद यांची द्वंद्वात्मक घडण करणारी मूसच होती, हे कदापि विसरता येणार नाही.

* * *

# 'चे' गव्हेरा जीवनपट

**१४ जून १९२८:**
रोझारिओ, अर्जेन्टिना येथे जन्म

**१९५३:**
त्वचारोगतज्ञ म्हणून वैद्यकीय पदवी शिक्षण पूर्ण

**७ जुलै १९५३-१९५४:**
लॅटिन अमेरिका पालथा घालून तो १९५३ मध्ये ग्वाटेमालात पोहोचतो. तेथे त्याची क्यूबाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या हद्दपार देशभक्तांशी गाठ पडते. ते त्याचे नामकरण 'चे' असे करतात. सीआयए ने ग्वाटेमालाचे याकोबो आर्बेन्झ सरकार लष्करी कारस्थान करून कसे उलथून टाकले याचा तो साक्षीदार बनतो.

**जुलै १९५५:**
फिडेल कॅस्ट्रोची भेट. क्यूबाचा हुकूमशहा फुल्गेन्सिओ बातिस्ताच्या विरोधात सुरू करण्यात आलेल्या २६ जुलै आंदोलनात सहभागाचा निर्णय.

**२५ नोव्हेंबर १९५६:**
फिडेल कॅस्ट्रोच्या नेतृत्वाखाली चे आणि ८१ जणांची "ग्रॅनमा" बोटीतून क्यूबातील "सिएरा माएस्त्रा" पर्वताच्या बाजूने गनिमी चढाई सुरू.

**२१ जुलै १९५७:**
'चे' कमांडरपदी बढती. “चिरो रेदोन्दो” तुकडीचे नेतृत्व सोपवण्यात येते.

**२४ फेब्रुवारी १९५८:**
'चे'ने स्थापन केलेल्या 'रेडिओ रेबेल्दे'चे पहिले प्रसारण.

**२९-३१ डिसेंबर १९५८:**
बातिस्ताला अखेरचा धक्का देणाऱ्या "सान्ता क्लारा" लढाईचे नेतृत्व.

**३ जानेवारी १९५९:**
क्रांती यशस्वी. पहाटे-पहाटेच 'चे' हॅवानात प्रवेश करतो. कॅस्ट्रो “ला कबाना' किल्ल्याचा लष्करी ताबा 'चे'च्या हवाली करतो.

**१२ जून १९५९:**
संयुक्त अरब प्रजासत्ताक, भारत, इंडोनेशिया, श्री लंका, युगोस्लाव्हिया, म्यानमार, जपान, पाकिस्तान, सुदान आणि मोरोक्को या देशांशी व्यापारी, सांस्कृतिक आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व

**७ ऑक्टोबर १९५९:**
राष्ट्रीय जमीन सुधारणा संस्थेच्या औद्योगिकीकरण विभागाच्या प्रमुखपदी नेमणूक.

**२६ नोव्हेंबर १९५९:**
बँक ऑफ क्यूबाच्या अध्यक्षपदी नेमणूक.

**२३ फेब्रुवारी १९६१:**
उद्योगमंत्री म्हणून नेमणूक

**११ डिसेंबर १९६४:**
युनोच्या सर्वसाधारण सभेत भाषण.

**जानेवारी-मार्च १९६५:**
चीन, माली, काँगो, गिनी, घाना, दाहोमी, टांझानिया, इजिप्त, अल्जेरिया देशांना भेटी. भेटीदरम्यान त्या देशांचे राष्ट्रप्रमुख आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यांच्या नेत्यांसोबत बैठका.

**२४ फेब्रुवारी १९६५:**
अल्जेरियात दुसऱ्या आफ्रो-आशियाई चर्चासत्राला मार्गदर्शन.

**१ एप्रिल १९६५:**
काँगोतील मुक्तीलढ्यात सहभागी होण्यासाठी वेषांतर करून क्यूबातून रवाना; तेथे लढणाऱ्या लॉरेन्ट कबिलाच्या गनिमी पथकात सामील.

**२१ नोव्हेंबर १९६५:**
काँगोतील सात महिन्यांची मोहीम अयशस्वी झाल्यानंतर 'चे' टांझानियाला रवाना होतो. तेथे कित्येक आठवडे अज्ञातवास. डिसेंबरच्या अखेरीस झेकोस्लोव्हाकियाला जाऊन तेथेही कित्येक महिने अज्ञातवास.

**३ नोव्हेंबर १९६६:**
सशस्त्र उठावासाठी बोलिव्हियात आगमन.

**८ ऑक्टोबर १९६७:**
ऐन धुमश्चक्रीत सीआयएच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या बोलिव्हियन सैन्याच्या हाती पडतो. त्याला कैदेत ठेवण्यात येते.

**९ ऑक्टोबर १९६७:**
दुपारी १.३० वाजता ला हिग्वेरा या शहरातील एका लहानश्या शाळेच्या इमारतीत सार्जंट मारिओ तेरान त्याची हत्या करतो.

# अर्नेस्टो चे गव्हेरा यांचे लेख
## क्यूबातील समाजवाद आणि माणूस
## त्रिखंडाला संदेश

# क्यूबातील समाजवाद आणि माणूस

(उरुग्वेमधील साप्ताहिक मार्चा चे संपादक कार्लोस क्विहानो यांना पाठवलेले पत्र. ते १२ मार्च १९६५ रोजी प्रसिद्ध झाले होते.)

प्रिय कॉम्रेड,

या टिपणांद्वारे मी एक शब्द पाळतोय. तो पाळण्यास तसा जरा उशीरच झालाय. मी आफ्रिकेत प्रवास करता करताच ही टिपणं लिहितोय. त्यांचं सूत्र काय आहे, हे शीर्षकातून स्पष्ट होईल. उरुग्वेतील वाचकांना त्यात रस वाटेलही, बहुतेक.

"समाजवादात राज्यसंस्थेच्या हितासाठी व्यक्ती नष्ट केली जाते", असा दावा भांडवलशाहीचे समर्थक करत असतात. निदान आपण समाजवादाच्या ज्या टप्प्यावर प्रवेश केला आहे, त्याविषयी तरी असं म्हणत असतात. हा दावा सैध्दांतिक पातळीवर खोडता येणं सहज शक्य आहे; पण मी ते करणार नाही. त्या ऐवजी क्यूबात काय घडत आहे, ते वास्तव तुमच्यासमोर मांडणार आहे. आणि त्यावरील माझी सर्वसाधारण मतं. त्यासाठी सत्ता ताब्यात घेण्याआधीच्या आणि नंतरच्या क्रांतिलढ्याचा इतिहास नजरेखालून घालावा लागेल.

जानेवारी १९५९ मध्ये शिखराला पोचलेल्या या क्रांतिलढ्याचा आरंभ झाला झाला होता २६ जुलै १९५३ रोजी. त्या दिवशी सकाळी फिडेल कॅस्ट्रोच्या नेतृत्वाखाली एक गटानं ओरिएन्तेमधील मोन्काडाच्या बराकींवर हल्ला चढवला होता. तो हल्ला फसला; फसलाच नव्हे, तर आपत्तीजनक ठरला. जिवंत राहिले ते पकडले गेले. करारानंतर त्यांना सोडून देण्यात आलं आणि त्यांनी पुन्हा क्रांतिकुंडात उडी घेतली.

या लढ्यात समाजवादाचं बी फक्त रुजलेलं होतं. त्यामागं पायाभूत होता, माणूस. आमचा माणसावर विश्वास होता, विशिष्ट व्यक्तीवर, नाव आडनाव असलेल्या व्यक्तीवर. मोहिमेचं यशापयश माणसाच्या क्षमतेवर अवलंबून होतं.

त्यानंतर आला गनिमी लढाईचा टप्पा. या टप्प्याचे दोन वेगवेगळे घटक होते: ज्याला संघटित करायचं तो, पण अजूनही जाग न आलेला जनतेचा समुदाय आणि त्यांच्यासाठी गनिमी काव्यानं लढणारं बिनीचं पथक. समुदायाला जाग आणणारी शक्ती. क्रांतिकारक जाणिवेचे, कडव्या दुर्दम्य संघर्षाचे प्रणेते. विजयासाठी आवश्यक असलेला आत्मनिष्ठ घटक तयार करणं, हे या बिनीच्या पथकाचं काम.

आमच्या विचारांची चौकट कामगारवर्गीय बनत होती. आमच्या सवयीतच नव्हे, तर मनातही क्रांतिकारक बदल होत होते. आणि त्यांचा पाया होता, व्यक्ती. सिएरा मेस्त्रात लढलेल्या प्रत्येक लढवय्याच्या नावावर वीरश्रीयुक्त

कामगिरी लागलेली आहे. ते क्रांतीचे शिलेदार बनले आपल्या वैयक्तिक गुणांवर.

वीरश्रीयुक्त लढ्याचा हा होता, पहिला टप्पा. त्यात प्रत्येक लढवय्या मोठ्यात मोठी जबाबदारी स्वीकारायचा. जास्तीत जास्त धोका पत्करायचा. केवळ कर्तव्य पार पाडण्याचं समाधान मिळतं म्हणून. दुसरा कसलाच लाभ नाही. आमच्या क्रांतिशिक्षणात आम्ही वारंवार हा धडा गिरवतो: क्रांतीसाठी कसलाही त्याग करायची जिद्द. आमच्या आजच्या लढवय्यांत दिसतो उद्याचा माणूस.

क्रांतीला वाहून घेण्याच्या किती प्रसंगांत क्रांतिकारकांनी स्वतःला झोकून द्यावं? ऑक्टोबर पेचप्रसंग असो, की फ्लोरा वादळ. संपूर्ण जनतेनं एकदिलानं आणि असामान्य शौर्यानं त्यांचा सामना केला. दैनंदिन जीवनालाही जनतेनं याच असामान्य शौर्यानं भिडावं, भिडत रहावं अशी मानसिकता बनवणं, हे आपल्यापुढील मूलभूत कार्य आहे.

जानेवारी १९५९ घ्या. त्यावेळी पहिलं क्रांतिकारक सरकार स्थापन झालं होतं, पण त्यात सहभागी झाले होते बूर्ज्वा वर्गाचे कित्येक कारस्थानी, क्रांतिद्रोही लोक. हातात आलेली सत्ता अबाधित राखण्यासाठी बंडखोर सैन्याचं बळ मिळणं आवश्यक होतं.

सत्ता हातात आल्या आल्या तिच्या पोटात गंभीर अंतर्विरोध निर्माण झाले. फिडेल कॅस्ट्रोने फेब्रुवारी १९५९ मध्ये पंतप्रधान म्हणून सूत्रं हाती घेतली आणि क्रांतीने त्या अंतर्विरोधातून मार्ग काढला. त्यानंतर जनतेचा दबाव वाढत गेला आणि त्या दबावामुळे जुलैमध्ये अध्यक्ष उरुतिया यांना राजीनामा द्यावा लागला.

क्यूबन क्रांतीच्या रंगमंचावर आता एका नव्याच ठाशीव पात्रानं जोरदारपणे प्रवेश केला होता: जनसमुदायानं. हे पात्र वारंवार मोठी कामगिरी पार पाडत राहणार होतं. जनतेचा समुदाय म्हणजे मेंढरांच्या कळपासारखी नुसती गोळाबेरीज नव्हे. किती चेहऱ्यांतून, किती अंगांद्वारे तो प्रत्यही व्यक्त होत असतो! समुदाय म्हणजे ओळीत मांडलेले, सत्ताधारी व्यवस्थेने बनवलेले छापाचे गणपती नव्हेत. त्यांना नेता असतो, ते नेत्याचे अनुयायी असतात, हे खरेच. ते निःशंकपणे आपल्या नेत्यांच्या, विशेषतः फिडेल कॅस्ट्रोच्या, पाठीशी उभे आहेत. पण मुळात त्यानं जनतेचं हे निर्भेळ समर्थन कशाच्या जोरावर कमावलं? जनतेच्या आशा, अपेक्षा आणि आकांक्षा तो अंतर्बाह्य जाणून होता. त्यामुळेच जनतेनं जणू डोळे झाकून त्याच्यावर विश्वास टाकला. आपल्या आशा-आकांक्षा त्याच्या हाती सुरक्षित आहेत, ही त्यांची श्रद्धा होती आणि आहे. आणि त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तोही हातचं काहीही न राखता जिवाच्या करारानं लढतच राहिला. त्यांना दिलेली वचनं खोटी पडू नयेत, यासाठी तो प्रयत्नांची पराकाष्ठा करत राहिला.

सत्ता ताब्यात आल्यानंतर सरकारी उद्योग यशस्वीरत्या चालवण्याचं आणि शेती व्यवस्थेत सुधारणा करण्याचं जबरदस्त आव्हान होतं. त्यात पिग्जच्या आखाताचा समरप्रसंग उद्भवला. ही आव्हानं जनतेनं मोठ्या धैर्यानं पेलली. हे काही सहजासहजी झालेलं नव्हतं. सीआयएनं कितीतरी टोळ्या शस्त्रसज्ज केल्या होत्या; त्यांच्याशी दोन हात करायचा कडवा अनुभव जनतेच्या गाठीला होताच. ऑक्टोबर पेचप्रसंग तर तिच्या जिवावरच उठला होता. तो तिच्या अस्तित्वाचाच प्रश्न बनला होता. आपलं संरक्षण जनतेनं स्वतःच्या हातात घेतलं होतं. त्या अनुभवांत कणखर झालेले हात आता समाजावाद बांधायच्या कामाला लागले आहेत.

समाजवादात व्यक्तीला शासनसंस्थेपुढे मान तुकवावी लागते, असा सततच दावा केला जातो. वर वर पाहता, काहीजणांचा त्यावर गैरसमजानं विश्वास बसतोही. समाजवादाच्या बांधणीत सरकार काही उद्दिष्टं समोर ठेवतं. अर्थव्यवस्था, संस्कृती, संरक्षण, क्रीडा आदी क्षेत्रात साध्य करायची उद्दिष्टं. जनता अपूर्व उत्साहानं आणि शिस्तीनं ती हस्तगत करण्यासाठी झटू लागते. याबाबतीतला पुढाकार क्रांतिकारी नेतृत्व घेतं. आपल्या बाबतीत तो फिडेल कॅस्ट्रो घेतो. जनतेला समजावून सांगितलं जातं, पटवून दिलं जातं. जनतेला पटलं की ते उद्दिष्ट जनतेचं बनतं.

सामुदायिक उद्दिष्ट. कधी कधी उद्दिष्ट तळातूनही वर येतं. स्थानिक मातीत उमललेल्या उद्दिष्टाला पक्ष आणि सरकार खतपाणी घालून ते जोपासतात, त्याला सार्वत्रिक रूप देतात.

पण कधी कधी शासन चुकाही करतं. अशी एखादी चूक झाली, की लोकांच्या सामुदायिक उत्साहाला ओहोटी लागते. प्रथम एकेक व्यक्ती, एकेक घटक त्यातील स्वारस्य हरवून बसू लागतात. मग त्याचं रूपांतर सामुदायिक अनास्थेत होतं. उदासीनता सामुदायिक रूप धारण करते. काम ठप्प होऊन जातं. आता जनतेच्या हातून काहीच होत नाही. हीच वेळ असते, चूक दुरूस्त करण्याची. १९६२ च्या मार्चमध्ये असाच प्रसंग गुदरला होता. अनिबाल एस्कलान्तेनं पक्षावर संकुचित, पंथवादी धोरण आणि कार्यपद्धती लादायचा प्रयत्न केला होता. त्यामुळे क्रांतीला नव्या अडचणीला तोंड द्यावं लागलं होतं.
धोरणात बदल करण्यासाठी स्वीकारलेली उपायाची पद्धत फारशी प्रभावी ठरली नव्हती. हा अनुभव पाहता जनतेशी असलेला दुवा जास्त मजबूत करायला हवा. येत्या काळात त्यात सुधारणा करायला हवी. आपल्याला भेडसावणारे प्रश्न सोडवताना वरिष्ठ नेतृत्व एक पद्धत वापरत असते: एखादं उद्दिष्ट वरच्या स्तरावर स्वीकारल्यास त्याला जनतेची काय सर्वसाधारण प्रतिक्रिया असेल, याचा अंदाज घेतला जातो. अर्थात, असा अंदाज जोखण्याची काही खास यंत्रणा नेतृत्वानं उभारलेली नाही. जनमताचा कानोसा घ्यायची सवयच अंगवळणी पडलेली आहे. ही पद्धती सर्व सहभागी घटकांच्या नेणिवेतच जणू वसलेली आहे.

जनतेच्या मनातला आवाज ऐकण्यात स्वतः फिडेल कॅस्ट्रो मोठा माहीर आहे. तो स्वतः जनतेत कसा विरघळून जातो, हे त्याला प्रत्यक्षात मैदानात पाहिल्याशिवाय कळणं शक्य नाही. जाहीर सभांत तो बोलत असताना जणू संगिताच्या दोन तारांचा सादप्रतिसाद चालू असतो. त्यांच्या कंपनांतून एक नवाच ध्वनी अवतरतो. फिडेल आणि समुदाय यांच्या परस्परांच्या कंपनांतून संवाद एक तीव्र लय गाठतो. आणि संघर्षावर मात करायच्या एकदिलाच्या सामुदायिक हाकेत तो मेळ पराकोटीला पोचतो. क्रांतीच्या अनुभवाला जे पारखे असतात त्यांना व्यक्ती आणि समष्टी यांच्यातील द्वंद्वात्मक वीण म्हणजे काय, हे कळणं शक्यच नाही. तिथं व्यक्ती समष्टीरूपातच आपल्या नेत्यांशी संवाद साधत असतात.

भांडवलशाहीतही अशा स्वरूपाचं दृश्य नजरेला पडू शकतं. त्यातील राजकारणी जनतेचं सामुदायिक मत बनवण्यात यशस्वी झालेले दिसतात. पण ते अस्सल सामुदायिक आंदोलन नसतं. तसं असतं तर ते भांडवली राहिलंच नसतं. ती नेतेपदी असलेली व्यक्ती आहे, तोपर्यंतच ती स्वप्नं जागी राहतात. किंवा भांडवलशाही समाजाचं कटु वास्तव त्या भ्रामक स्वप्नांचा चक्काचूर करीपर्यंत.

भांडवली समाजात एक निष्ठूर नियम माणसाला नियंत्रणात ठेवून त्याला कळसूत्री बाहुलीसारखा नाचवत असतो. आपल्याला कोण आणि काय असं नाचवतंय, हेही त्याला कळत नसतं. तुटलेला, परात्म झालेला मानव त्याला न दिसणाऱ्या एका अदृश्य धाग्यानं समाजाशी करकचून जखडलेला असतो. तो धागा असतो: मूल्य सिध्दांताचा. मूल्य सिध्दांत आयुष्याचं प्रत्येक अंग न अंग ग्रासून टाकतो. त्याची भविष्यात वाटचाल कशी होणार, हेही ठरवून टाकतो. त्या यात्रेची दिशाही बाहेरून आणि यात्रेला प्रस्थान ठेवण्याआधीच ठरवून देतो.

व्यक्तीला दिशेची निवड करायची काहीही संधी नसते. भांडवलशाहीचे नियम अंधपणे समाजाला दिशाहीन करत असतात. ते सामान्यजनांना दिसत नाहीत. त्यांच्या नकळतच ते त्यांच्या जगण्याचं नियमन करत असतात. प्रगतीसाठी समोर विस्तीर्ण, अमर्याद क्षितिज खुलं आहे, असा भ्रम जनतेच्या मनात पैदा करत असतात. रॉकफेलरसारखी उदाहरणं देत भांडवलशाहीचं मोहमयी खोटं चित्र उभं करतात. व्यक्तीच्या यशाचं भ्रामक चित्र. या चित्रात एक रॉकफेलर निर्माण व्हायला किती लोकांना दैन्य भोगावं लागतं, त्याच्या संपत्तीच्या राशीसाठी किती जणांना वंचित जीवन जगावं लागतं, हे कधीच रेखाटलं जात नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना ते दिसतच नाही. (परावलंबी देशांच्या होत असलेल्या शोषणाकडे दुर्लक्ष करत, जणू त्या शोषणाशी हातमिळवणी करत साम्राज्यवादी देशांतील कामगार आंतरराष्ट्रीय वर्गीय बंधुभाव कसे विसरतात, त्यामुळे साम्राज्यवादी देशांतील

जनतेचा लढाऊपणा कसा कमी होतो, याची चर्चा करणं आवश्यक आहे; पण तो मुद्दा या टिपणांच्या कक्षेत येत नसल्यानं आपण त्याचं विश्लेषण करत नाही आहोत.)

ते काहीही असो, पण यशाच्या मार्गात खाचखळगे असले, तरी व्यक्ती आपल्या अंगभूत योग्य गुणांच्या जोरावर ते पार करत यश प्राप्त करू शकते, असं चित्र रंगवलं जातं. यशसिध्दी दूरवर असते आणि तिथपर्यंत एकांडेपणानंच जायचं असतं, असं बिंबवलं जातं.  शिवाय, ती रानटी स्पर्धा असते. तीत उतरणाऱ्या प्रत्येकास लांडगेतोड करावी लागते. दुसरा अपयशी होण्यावरच एखाद्याचं यश अवलंबून असतं.

आता मी व्यक्तीची व्याख्या करण्याचा प्रयत्न करणार आहे. समाजावादाची बांधणी खूप नाट्यमय रित्या होत असते. त्यातील व्यक्ती एकाच वेळी विशिष्ट असते, तरीही समाजाचा अतूट सदस्य असते. व्यक्तीच्या या दुपेडी अस्तित्वाविषयी आपण काही समजून घेऊ या.

व्यक्ती मुळात अपुरी असते, ती पूर्णतः घडलेली नसते, हे ध्यानात घेणं एकदम सोपं असतं.

भूतकाळाचे अवशेष सतत आपल्या जाणिवेत घुसवले जात असतात, आणि आपल्याला ते सतत कष्टानं निपटून, पुसून टाकावे लागतात. ही दुहेरी प्रक्रिया असते. एका बाजूला समाज प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या शिकवत असतो, तर दुसरीकडे व्यक्ती जाणीवपूर्वक स्वतः शिकत असते. नव्या समाजाला जन्माला येताना भूतकाळाशी जबर, जीवघेणी स्पर्धा करावी लागते. जुन्या समाजात व्यक्तीला अलग राहण्याचं पध्दतशीर शिक्षण दिलेलं असतं. व्यक्तीनं हर तऱ्हेनं इतरांपासून तोडूनच जगायचं असतं, असं तिच्या जाणिवेत ठासून भरलेलं असतं. तेव्हा जुन्याचं भूत तिच्या जाणिवेच्या मानगुटीवर बसलेलं असतंच, परंतु जुनंपानं वर्तमानाहून वेगळं असं राहत नाही. ते या समाजात टिकून राहतं आता क्रयवस्तू झालेल्या सामाजिक नात्यांत. क्रयवस्तू ही भांडवली समाजाची आर्थिक पेशी असते. ती जिवंत असेपर्यंत उत्पादन पध्दतीवर तिचे परिणाम होतच असतात. इतकेच नव्हे, तर क्रयवस्तू व्यक्तीच्या जाणिवेतदेखील घर करून बसते. नव्हे, ती जाणिवेवर पक्की मांड ठोकून बसलेली असते.

मार्क्सनं अशा समाजाच्या बदलाची रूपरेषा आखून दाखवली. आपल्याच अंतर्विरोधानं आतून फुटणाऱ्या समाजाचं यथातथ्य चित्र त्यानं आपल्या नजरेला आणून दिलं. पहिल्यांदा साम्राज्यवादी विषवृक्षाच्या कुजलेल्या फांद्या तोडाव्या लागतात हे आपल्याला इतिहासानं दाखवून दिलं आहे. - त्या तोडता येतात, हे लेनिन या प्रेषिताच्या नजरेला दिसलं.

या देशांतल्या जनतेला या ना त्या तऱ्हेनं त्रासण्याइतकी भांडवलशाही विकसित झाली होती. पण ती त्या ठिकाणी कोसळली ती आपल्या पोटातील अंतर्विरोध तुटण्याइतके ताणले गेले, म्हणून नव्हे. परकीय शोषकापासून मुक्तीसाठी चाललेली लढाई, युद्धासारख्या घटनांचा लाभ उठवत  जनतेवर लादलेलं ओझं,  जनतेचं वाढतं दैन्य – यांच्या परिणामी परिस्थिती स्फोटक होते. डोळस कृती उरलेला कार्यभाग पार पाडते.

य देशांतून अजून श्रमिकांचं शिक्षण पुरं झालेलं नाही की सामाजिक संपत्ती अजून त्यांच्या ताब्यात आलेली नाही. खुंटलेला विकास आ णि 'सुसंस्कृत' देशांच्या दिशेनं भांडवलाचं पलायन यामुळे अपार त्याग केल्याशिवाय परिवर्तन होत नाही. आर्थिक पाया रचण्यासाठी प्रदीर्घ मेहनत घ्यावी लागते. विकासासाठी लोकांना ऐहिक लाभाचं आकर्षण दाखवण्याची मळलेली वाट चोखाळण्याचा मोह भल्याभल्यांनाही आवरत नाही.

तात्कालाच्या, तपशिलाच्या जंजाळात अडकून दूरचा पल्ला दृष्टीआड होण्याचा धोका मोठा असतो. भांडवलशाही मागं ठेवून गेलेल्या बोथट साधनांच्या साह्यानं समाजवाद बांधायचं भोंगळ स्वप्न चुकीच्या दिशेनं घेऊन जातं. समाजवादाच्या उभारणीसाठी भांडवलशाहीतील आर्थिक पेशी – क्रयवस्तू, नफेखोरी, वैयक्तिक आर्थिक लाभ - कुचकामी ठरतात. ती जुनाट साधनं वापरली की कपाळमोक्ष ठरलेला. कडेलोटाच्या अवस्थेला येईपर्यंत आपलं

नेमकं चुकलं काय, कुठं रस्ता चुकला हे कळायलाही मार्ग नसतो. दरम्यानच्या काळात केलेल्या चुकीच्या आर्थिक पायाभरणीमुळे जाणिवेचा विकासही खुंटलेलाच राहातो. कम्युनिझम उभारण्यासाठी आर्थिक पायासोबतच नवा माणूस जन्माला घालावा लागतो.

म्हणूनच जनतेला नवसंजीवनी देण्यासाठी, त्याला सामुदायिक आत्मबळ देण्यासाठी योग्य साधन वापरलं पाहिजे. मुख्यतः साधनाला नैतिकतेची धार हवी. त्याचबरोबर भौतिक लाभांकडे दुर्लक्ष होता कामा नये, विशेषतः सामाजिक भौतिक लाभ ही महत्वाची प्रेरणा असू शकते.

अत्यंत धोक्याच्या क्षणी माणूस आहे नाही ते नैतिक बळ गोळा करू शकतो. त्याला आजवर जणू कधीच न झालेल्या नैतिक बळाचा साक्षात्कार होतो. पण ते बळ टिकून राहायचं असेल, तर नव्या मूल्यव्यवस्थेचा आधार आवश्यक असतो. आणि त्यासाठी अख्खा समाज हेच एक महा विद्यालय बनावं लागतं.

सर्वसाधारणतः भांडवली समाजाच्या सुरूवातीला होती, तशीच ही प्रक्रिया असते. त्या वेळी भांडवली मूल्यप्रणालीला सुसंगत अशी सामाजिक जाणीव निर्माण होऊ लागते. भांडवलशाही बळ जरूर वापरते; पण ती तेवढ्यावर थांबत नसते, ती लोकांना आपल्याला हव्या नव्या व्यवस्थेचं शिक्षणही देत असते. समाज वर्गीय असतो, तो अनिवार्यपणे वर्गीय शोषणावर आधारलेला असतो, हा समज 'सत्य' बनवला जातो. त्या 'सत्या'चा उघडपणे सतत प्रचार केला जातो. त्यासाठी कुणी उत्पत्तीमागे दैवी प्रेरणा पाहतो, तर कुणी निसर्ग नियमांच्या यांत्रिक कार्यकारणाचा दाखला देतं. मानवी आणि नैसर्गिक अस्तित्वाचे सिध्दांत म्हणून ते रूढ होतात. माझं शोषण दैवी प्रेरणेमुळे होत असेल, किंवा निसर्गानंच तसं ठरवलं असेल, तर मी बापडी काय करणार, अशा भ्रमात मजूर स्त्री जीवन कंठू लागते. त्या कर्त्या करवत्याला मी काय सांगणाार, असा तिचा पक्का ग्रह होतो.

पण आशा जागी होतेच. जाती व्यवस्थेवर आधारीत समाजाहून भांडवली समाज वेगळा असतो. जातींनी बंदिस्त समाजातून बाहेर जायच्या साऱ्या वाटा बंद केलेल्या असतात. भांडवलशाही या वाटा खुल्या करते. पण काही लोकांना वाटतं की जाती व्यवस्था अपरिवर्तनीय आहे. मागच्या जन्मीच्या पापामुळे तुम्ही खालच्या जातीत जन्माला आला आहात, हे त्यांच्या माथी मारलं जात असतं. दिलेलं कर्तव्य पार पाडा, म्हणजे पुण्य गाठीला बांधून मेल्यानंतर स्वर्ग मिळेल, हे कानीकपाळी ओरडून सांगितलं जात असतं. हे निमूटपणे मान्य करणारे या जन्मात नरकयातना भोगून स्वर्गारोहण करायला लायक होतात. इतरेजनांना मुक्तीची एक अनोखी सोय असते : वर्गभेद अपौरुषेय असला, तो नियतीनं जन्माला घातलेला असला तरी व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर तिच्या कचाट्यातून सुटू शकते. सेल्फ मेड मॅन हा नवा आदर्श भांडवलशाही निर्माण करते. ही माणसाची आजवरची सर्वात मोठी ऐतिहासिक फसवणूक असते. असत्य हेच सत्य म्हणून विचारसरणीत विराजमान केलं जातं.

आपल्या दृष्टीनं थेट शिक्षणाला खूप महत्व येतं. सत्याचा थेट निर्देश केल्यानं ते पटवून देण्यासाठी युक्त्या प्रयुक्त्या कराव्या लागत नाहीत. तांत्रिक असो वा वैचारिक, सर्वच शिक्षणाची जबाबदारी शासन घेतं. पक्षाची संघटना त्याला साह्यकारी भूमिका घेते. सर्वच समुदायांना आता शिक्षणाची दारं सताड खुली होतात. नवे विचार सवयीचे होऊ लागतात. समुदायच शिक्षक बनू लागतात. शिक्षणव्यवस्था आणि समाज यांच्यात आजवर खणण्यात आलेली खोल दरी मानवी इतिहासात प्रथमच भरून निघते. औपचारिक शिक्षणाला अनौपचारिक शिक्षणाची समर्थ जोड मिळते. शिक्षण समुदायाच्या अंगाअंगात भिनून जातं. आजवर न आलेली दृष्टी जणू जन्मतःच लाभण्यासाठी मनुष्य सिद्ध होतो. डोळसपणा ही समाजाची सवय होते. सुशिक्षितांचे समुदाय समाजातील अशिक्षितांवर आपोआपच नवे संस्कार करू लागतात. औपचारिक शिक्षणव्यवस्थेसोबतच समुदाय करत असलेलं अनौपचारिक शिक्षण ही एक जबरदस्त शक्ती बनते.

शिक्षणाची ही प्रक्रिया खूप जाणीवपूर्वक जोपासलेली असते. व्यक्तींना नव्या सामाजिक शक्तीचा प्रत्यही प्रत्यय येऊ लागतो. त्या शक्तीची इयत्ता गाठण्याचा त्या प्रयास करू लागतात. आपल्यात असलेल्या त्रुटी भरून

काढण्याची शर्थ करू लागतात. आधीच्या समाजव्यवस्थेत हा अवकाश उपलब्धच नसतो. अनौपचारिक शिक्षणाच्या सामाजिक पर्यावरणात ही संधी निर्माण होते . व्यक्ती समाजाच्या साह्यानं आपल्यातल्या त्रुटी भरून काढू लागतात. त्यांच्या खुंटलेल्या विकासाला धुमारे फुटू लागतात. आत्मशिक्षणाचं, स्वाध्यायाचं खरं दालन खुलं होतं. व्यक्तीच आता स्वतःच्या शिक्षक-शिक्षिका बनू लागतात.

समाजवादाची उभारणी करण्याच्या या अवस्थेत नवा माणूस जन्म घेताना दिसू लागतो. अर्थात ही नवी मूर्ती अजून पूर्ण घडायची असते. खरं तर, तिची घडण कधीच पुरी होत नसते. मानवी क्षितिजं जसजशी खुलत जातात, तसतश्या विकासाच्या कक्षाही रूंदावत जात राहतात . मानव ही सतत घडत राहणारी मूर्ती बनत राहते.

शिक्षणाच्या अभावी काही जणांना वैयक्तिक महत्त्वाकांक्षा साधण्यासाठी स्वतःचा वेगळाच मार्ग शोधावा लागतो. तसेच सर्वांच्या एकजुटीनं चाललेल्या यात्रेतही काहीजण एकांडेपणे मार्गक्रमण करणारे असतातच. हे काहीही असलं तरी प्रत्येक व्यक्तीत आपण समाजाशी जैवरित्या निगडित असलं पाहिजे, याची सततची जाणीव विकसित होत असते. तसेच, आपण समाजाचं जनित्र असल्याची जाणीवही त्यांच्यात हरघडी विकसित होत असते. आणि अशी जाणीव निर्माण होणं अतिशय महत्त्वाचं असतं.

दूरवर दिसणाऱ्या आशा-आकांक्षा हस्तगत करण्यासाठी माणसाला आता आंधळेपणानं चाचपडावं लागत नाही. त्यांना दिशा दाखवणारं, समुदायाच्या खांद्याला खांदा लावून आघाडी सांभाळणारं पक्षाचं आणि पुढारलेल्या माणसाचं बिनीचं पथक पुढ्यात येणारे काटेकुटे, खाचखळगे साफ करायचं काम करत असतं. त्या बिनीच्या पथकाची नजरही ध्येयाच्या ताऱ्यावर खिळलेली असतेच, पण ते आता केवळ व्यक्तीनं साधायचं ध्येय असत नाही. नवा माणूस घडवणारा समाज निर्माण करणं, हेच नवं ईप्सित असतं. कम्युनिस्ट मानव, हेच एकमेव ईप्सित.

रस्ता खूप लांबचा आहे; वळणावळणाचा आहे; डोंगरदऱ्यातून जाणारा आहे. कधी कधी वाट हरवून आपल्याला माघारीही यावं लागतं. कधी कुणी जास्त वेगानं जात समाजापासून अलग होत थोडं पुढंही जातं. एखाद्याचा वेग मंदावल्यानं मागचा त्याच्या अंगावर येऊन आदळण्याची शक्यताही असते. क्रांतीच्या भावनेनं झपाटून आपण जितक्या लवकर जाता येईल, तितक्या वेगानं चालत राहतो. पण समाज आपल्याला रसद पुरवत असल्यानं आपण त्याची साथ सोडत नाही. त्यामुळे, समुदायाचाच वेग वाढवण्याची जिद्द व्यक्तीत पैदा होते. समुदाय तिचं अनुकरण करायला सिद्ध होतो.

समाजवादाच्या बांधणीत सहभागी न होणारे काही मूठभर महाभाग असतातच. ते सोडूनही समाजात दोन गट तयार झालेले असतात. सर्वच नैतिक प्रेरणेनं भारलेले असतात, असं नव्हे. त्यांच्यात सामाजिक जाणीव अजून पुरेशी निर्माण झालेली नसते. बिनीचं पथक जाणिवेनं निश्चितच समुदायाच्या आघाडीवर असतं. समुदायाला नव्या मूल्यांची काही माहिती झालेली असते, पण ती अजून त्यांच्या पूर्णतः अंगवळणी पडलेली नसतात. बिनीच्या पथकातील सदस्यांत गुणात्मक बदल झालेला असल्यानं त्यांच्याकडून अपेक्षित त्याग सहज होत राहतो. उर्वरीत लोकांना संपूर्ण चित्र नजरेत साठवता न आल्यानं त्यांचं शिक्षण करावं लागतं, त्यांना लाभ द्यावे लागतात, त्यांना खेचावं लागतं, प्रसंगी पुढं ढकलावंही लागतं. अशा रीतीनं कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता पराभूत वर्गांच्या दमनासाठी असते, तशीच ती विजयी वर्गाच्या उत्थापनासाठीही असते.

या साऱ्याचा अर्थ असतो, क्रांती पूर्णतः यशस्वी होण्यासाठी क्रांतिकारी संस्थांची मालिकाच्या मालिका उभारावी लागते. समुदायांना आगेकूच करण्यासाठी साह्यभूत होईल अशी चांगलं तेलपाणी केलेली, नीट चालणारी यंत्रणा लागते. तसे महामार्ग तयार करावे लागतात. प्रत्येक अवयव स्वतंत्र रित्या कार्यरत असला तरी त्याचं कार्य समुच्चयातच अर्थपूर्ण होत असतं. अेक खिळा दूरवरच्या दुसऱ्याच चक्राला गती देण्याचं काम करत असतो. बिनीच्या पथकात सहभागी होणाऱ्याची जणू नैसर्गिक निवडच या प्रक्रियेतून होत असते. या बिनीच्या पथकाचं काम मोठं अवघड आणि आव्हानात्मक असतं. आपलं कर्तव्य बिनबोभाट पार पाडतील त्यांना लाभ तर झालेच

पाहिजेत; त्याच बरोबर अंगचुकारपणा करतील, विघ्न आणतील त्यांना दंडही करावा लागेल, त्यांचं दमन करावं लागेल.

आजवर ऊर्मींच्या रूपात असलेली क्रांती स्थायीरूप होण्याची प्रक्रिया आता सुरू होते. आजवर शासन आणि समाज यांच्यात एक दुभंग असतो. आता शासन आणि संपूर्ण समाज यांच्यात एकजिनसीपणा निर्माण करण्याचा शोध सुरू होतो. हा एकजिनसीपणा ही समाजवादाच्या बांधणीची पूर्वअटच असते. हा एकजिनसीपणा रुजवताना एक काळजी घ्यावी लागते. प्रातिनिधिक संसदेच्या पुनर्स्थापनेचा सोपा मार्ग टाळावा लागतो.

त्यासाठी क्रांती ही समाज बांधणारी नवी महासंस्थाच बनावी लागते. ती बनवण्यासाठी काही प्रयोग डोळसपणे आणि धाडसानं करावे लागतात. क्रांतीच्या संस्थेला स्थायीपण यायचं असेल तर अतिशय धीरानं, घाईचे मोह टाळत काम करावं लागतं. औपचारिक स्वरूपाच्या रचना टाळता येत नसतात. या औपचारिक रचना जणू समाजगतीला लागलेला ब्रेक आहे, असा समुदायांचा सहज समज होऊ शकतो. या औपचारिक रचना, संस्था व्यक्तीला समुदायापासून तोडून टाकतील अशी सतत भीती वाटत असते. परात्मतेवर मात करून मुक्त व्हायला निघालेल्या माणसाच्या प्रवासात ही अलगता नवी विघ्नं उत्पन्न करते. परात्मतेवर संपूर्ण विजय हेच तर क्रांतीचं अंतिम उद्दिष्ट असतं. त्याच्याशी तडजोड हा क्रांतीशी द्रोह असतो. हे अंतिम उद्दिष्ट कशाहीमुळे दृष्टीआड होता कामा नये, यासाठी नवा माणूस सजग असतो. त्यामुळे कसल्याही अलगावास आपण बळी पडू नये, याविषयी तो कमालीचा जागृत असतो.

नवा माणूस घडवणाऱ्या संस्था अस्तित्वात असतात कुठं? या अभावावर हळूहळू मात करावी लागते. एका उद्दिष्टासाठी लढ्यात उतरलेले व्यक्तींचे सजग समुदाय नवा इतिहास घडवू लागतात. सर्व व्यक्तींना एका किमान समान स्तरावर आणण्यासाठी समाजाचं काहीना काही प्रमाणीकरण होणं क्रमप्राप्त असतं. पण या प्रमाणीकरणामुळेच तर समाजवादात व्यक्तीला पूर्णत्वाकडे जायचा मार्ग खुला होतो. व्यक्तीनं हे पूर्णत्व कमावण्याची यंत्रणा अजून प्राथमिक अवस्थेतच असते. ती यंत्रणा बांधत जाणं, हेच तर नव्या संस्कृतीपुढील आव्हान असतं. व्यक्ती आत्माविष्कार करतच ही नवी रचना उभी करत असतात. ही रचना अजून अपुरीच असली तरी व्यक्तीसाठी आत्माविष्काराच्या शक्यता मात्र अमाप असतात.

उत्पादन, व्यवस्थापन सुविहित होण्यासाठी समुदायांना तंत्रज्ञान आणि वैचारिक धन हस्तगत व्हावं लागतं. परस्परांचा विकास हेच त्यांच्यातील आंतरिक नातं असतं. समृध्द तंत्रज्ञान आणि त्यापासून वंचित व्यक्ती हा मूलभूत विग्रह आता पार करायची प्रक्रिया सुरू झालेली असते. त्यासाठी व्यक्ती आणि समुदाय त्या प्रक्रियांचा खोलवर वेध घेऊ लागलेले असतात. एक सामाजिक जीव म्हणून व्यक्तींची जाणीव विकसित होऊ लागते. हीच असते खास मनुष्यत्वाची जाणीव. परात्मतेच्या साखळ्या तुटल्याशिवाय मनुष्यत्वाची प्राप्ती होत नसते. मुक्त झालेल्या श्रमातून मनुष्य आपले नैसर्गिक, स्वाभाविक रूप पुन्हा प्राप्त करून घेत असतो. आता त्याचं मानवीपण कला-संस्कृतीमधून व्यक्त होऊ लागतं.

नवी संस्कृती विकसित करायची तर श्रमाला एक नवं स्थान बहाल केलं पाहिजे. आता माणसं क्रयवस्तू राहात नाहीत. सामाजिक कर्तव्य ही लादलेली गोष्ट उरत नाही. प्रत्येकीच्या वाट्याला सामाजिक कर्तव्याचा नव्हे, तर कर्तृत्वाचा हिस्सा येतो. आता उत्पादनाची साधनं समाजाच्या मालकीची झालेली असतात आणि यंत्र हे एक सामाजिक कार्य पार पाडायचं केवळ स्थळ बनलेलं असतं. आता जगण्यासाठी, केवळ प्राणी म्हणून जगण्यासाठी काम करायचं असतं, या त्रासदायक विचारातून मनुष्य मुक्त झालेला असतो. आता व्यक्ती ती करत असलेल्या निर्मितीतून व्यक्त होऊ लागते. सर्जनाची कृती त्याला पूर्णत्वाचा अनुभव देऊ लागते. आता दुसऱ्यासाठी केलेल्या श्रमाच्या रूपात माणसाला आपल्या मनुष्यत्वाचा बाजार मांडावा लागत नाही. ती करत असलेले श्रम हा तिच्या व्यक्तित्वाचा आविष्कार असतो. परात्मतेवर मात केलेल्या श्रमातून सामुदायिक मानवीपणाचा आविष्कार होत असतो.

तंत्रज्ञानाचा विकास हा स्वातंत्र्याची नवनवी क्षितिजं खुली करत जातो. श्रम आता क्रयवस्तू न राहिल्यानं ते सर्जक होतात, मानवीपणाची खूण बनतात. पण ही प्रक्रिया सहजसाध्य नसते. स्वेच्छेनं करत असलेल्या कामातही सक्तीचा अंश असतोच. फिडेल त्याला नैतिक दबाव म्हणतो. कामाकडे, श्रमाकडे पाहण्याच्या अध्यात्मिक दृष्टीत अजून संपूर्ण परिवर्तन व्हायचं असतं. जाणिवेतील बदल आपोआप होत नसतो. जसा तो अर्थरचनेतही आपोआप होत नसतो. हे बदल खूप सावकाश होत असतात. ते युगप्रवर्तक असल्यानं ते होण्यासाठी युगांची वाट पहावी लागते. तो प्रवास काही अगदीच बिनधक्क्यांचा असत नाही. कधी बदल अति वेगानं होतो, तर तो कधी अति मंद असतो. कधी कधी तर एखाददुसरं पाऊल मागंही पडतं.

<u>गोथा कार्यक्रमाची समीक्षा</u>मध्ये मार्क्स म्हणाला तसं हे संक्रमण अगदी निर्भेळ असत नाही. हे दालन नव्यानंच खुलं होत असल्यानं आपण तसे त्या बाबतीत अनभिज्ञच असतो. समाजावादाची प्राथमिक बांधणी पुढं साम्यवादाकडे नेत असते खरी. पण ते बांधकाम चालू असताना आजूबाजूला वर्गलढाईची धामधूम सुरूच असते आणि समाजातील भांडवली घटक वर्गसंघर्षाचा आत्मा झाकून, दडवून ठेवायचा प्रयत्न करत असतात.

या संक्रमण काळातील राजकीय अर्थशास्त्राचा अजून विकास झालेला नसतो. या व्यवस्थेचे नेमके घटक काय आहेत, याविषयीचा अभ्यास अजूनही बाल्यावस्थेतच असतो. त्याचबरोबर आपण पारंपरिक अभ्यास पध्दतींच्या सवयीत अडकलेले असल्यानं मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा विकासही तसा अडखळतच होत आहे. अशा वेळी तर सैध्दांतिक स्पष्टतेची फारच आवश्यकता आहे.

या सिध्दांतातून समाजबादाच्या बांधणीतील दोन खांब ठळकपणे उभारलेले दिसून येतात: नव्या स्त्रीपुरूषांचं शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा विकास. या बाबतीत, विशेषतः तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करण्याच्या बाबतीत अजून खूपच प्रगती करणं गरजेचं आहे. याचं कारण आज जगातल्या विकसित देशांनी याबाबतीतला मोठा पल्ला गाठलेला आहे. त्यांनी अनेक नवी दालनं खुली केलेली आहेत. म्हणून तर फिडेल जनतेच्या आणि खास करुन बिनीच्या पथकाच्या तांत्रिक आणि वैज्ञानिक शिक्षणावर इतका भर देत असतो.

उत्पादनाशी थेटपणे निगडित नसलेल्या विचार आणि कल्पनांच्या क्षेत्रात ऐहिक आणि अध्यात्मिक, आत्मिक भेद लगेच दिसून येतात. माणूस प्रदीर्घ काळ कला आणि संस्कृतीच्या माध्यमातून परात्मतेतून मुक्त होऊ पहात आलेला आहे. माणूस रोज क्रयवस्तू बनत आठ आठ तास मरत राहतो आणि नंतरच आत्माविष्काराच्या, सर्जनाच्या रूपात त्याच्या जिवाची धुगधुगी दिसत राहते. पण इथंही तो रोग त्याची पाठ सोडतच नाही. जगाशी संवादी होऊ पाहता पाहता माणसाला येणारा एकटेपणा, आजूबाजूचं सामाजिक पर्यावरण त्याच्या व्यक्तित्वावर घाला घालत असतं आणि तो आपलं प्राणपणानं स्वातंत्र्य जपू पाहत असतो. अशा घनघोर वातावरणात सौंदर्यकल्पना अद्वितीयतेचा घोषा करत निष्कलंक राहण्याचा अतोनात प्रयत्न करत असतात.

आणि ती एक फक्त पळवाट असते. मूल्यनियम हे उत्पादन संबंधांचं निव्वळ प्रतिबिंब राहिलेलं नसतं. मक्तेदार भांडवलशाहीनं त्या नियमालाच विविध साखळदंडांनी जखडत आपलं गुलाम केलेलं असतं. सांस्कृतिक इमल्यात कालाकार म्हणून प्रवेश करायचा तर त्याचं खास प्रकारचं शिक्षण करणं आवश्यक असतं. बंडखोरांनादेखील यंत्राचं गुलाम बनवलं जातं. खास प्रतिभा असल्याशिवाय त्याच्या कचाट्यातून कलाकार सुटत नाही. इतरांना या यंत्रणेला शरण जावं लागतं; जात नाहीत त्यांचा चिरडून चोळामोळा केला जातो.

अशा परिस्थितीत कला ही स्वातंत्र्याचं प्रतिक बनते, असा दावा करत प्रायोगिक कला जन्म घेते. पण या प्रायोगिकतेलाही मर्यादा असतात. व्यक्तीच्या परात्मतेच्या खडकावर प्रयोगांचे तारवे फुटू लागतात. मानवी चिंतेची वाफ बाहेर काढण्यासाठी निरर्थक वेदनांची सूक्तं गायली जाऊ लागतात, नाही तर बाजारू मनोरंजनाच्या अफूचं सर्रास सेवन हीच 'कलात्मक' अभिव्यक्तीची तऱ्हा होऊन बसते. कला हे निषेधाचं शस्त्र आहे, ही कल्पना

बोथट करण्याचा प्रयत्न होऊ लागतो.

या खेळाच्या नियमांपुढे मान तुकवतात त्यांचा गौरव होतो. नियमांच्या मर्कटलीला म्हणजेच उच्च अभिव्यक्ती असा समज प्रसृत केला जातो. त्या लीलांचं कौतुक करताना त्या अदृश्य पिंजऱ्यातून बाहेर पडायचा प्रयत्न तर केला जात नाही ना, हे अतिशय बारकाईनं तपासलं जात असतं.

सत्ता क्रांतीच्या अंकित येता क्षणी बाजारबुणग्यांची दाणादाण उडाली. क्रांतिकारक असोत वा नसोत, उरलेल्यांना नव्या वाटा दिसू लागल्या. कलाभिव्यक्तीच्या नव्या दिशा उजळू लागल्या. पळवाटा शोधणाऱ्यांची त्यातही भाऊगर्दी होऊ लागली. नव्या स्वातंत्र्याच्या वावटळीत कित्येक क्रांतिकारकांनाही 'तर-तम'चा विवेक करता येईना. याचं कारण त्यांच्या मनावर अजून मध्यमवर्गीय जाणिवांची पकड कायम होती.

या प्रक्रियेतून गेलेल्या काही देशांत विपरीत प्रतिक्रिया निर्माण झाली. पळपुटेपणाशी लढायच्या नावानं ते ग्रंथप्रामाण्याकडे झुकले. सांस्कृतिक अभिव्यक्ती निषिध्द मानली जाऊ लागली. निसर्गाचं यथातथ्य प्रतिबिंब हाच कलात्मकतेचा श्रेष्ठ आविष्कार असा प्रचार सुरू झाला. पुढं त्याचंच रुपांतर सामाजिक आदर्शाचं यांत्रिक प्रतिबिंब दाखवण्याच्या आग्रहात होऊ लागलं. वास्तवात नसलेला, कसलेही अंतर्विरोध नसलेला आदर्श समाज दाखवणं हेच कलेचं मूल्य होऊन बसलं.

समाजवाद अजून बाल्यावस्थेत असतो तेव्हा तो चुका करतच शिकत असतो. नवा माणूस घडवायचा तर जुन्या रीती सोडून नव्या वाटा चोखाळायचा बौद्धिक उद्दामपणा अंगी बाणवावा लागतो. जुन्या रीतींना जुन्या व्यवस्थेचा मळ लागलेला असतो. त्या नवा माणूस घडवण्यासाठी कुचकामी असतात. आशय आणि रूप यांच्या नात्याचा नव्यानं विचार होऊ लागतो. प्रगतीच्या दिशा गोंधळलेल्या असतात आणि आपण ऐहिक समस्या सोडवण्यात कमालीचे गुंतलेले असतो. 'थोर कले'वर अधिकार सांगणारे क्रांतीचे पाईक असतातच, असं नव्हे. अशा वेळी पक्षाच्या सभासदांना पुढाकार घेऊन जनशिक्षणाचं काम हाती घ्यावं लागतं.

याचा विचित्र परिणाम होतो. आपल्यापुढील कार्य खूप साधंसोपं, बिन गुंतागुंतीचं असल्याचा सार्वत्रिक समज होतो. सर्वांना सहज समजेल अशा भाषेतच बोललं पाहिजे, असा आग्रह होऊ लागतो. खरा कालत्मक शोध घेण्याची ऊर्मी संपुष्टात येते. केवळ समाजवादी वास्तव, आणि मृत भूतकाळ, समजून घेणं एवढंच सांस्कृतिक आव्हान असल्याचा समज होतो. मग मागच्या शतकातील आधारावर समाजवादी वास्तववाद उभा केला जातो.

पण १९ व्या शतकातील वास्तववादी कलेलादेखील वर्गीय आशय होता. ती व्यक्तीच्या परात्मतेचं दर्शन विसाव्या शतकातील ऱ्हासमान भांडवली अभिव्यक्तीहून जास्त प्रभावीपणे करते हे खरंच; पण तिचा वर्गीय आशय नजरेआड करता येत नाही.

पण एक प्रश्न उरतोच: समाजवादी वास्तववादाच्या थिजलेल्या रूपातच कलेची अभिव्यक्ती झाली पाहिजे असा दुराग्रह कशासाठी? समाजवादी वास्तववादाच्या विरोधात “स्वातंत्र्य” ही संकल्पना उभी करता येत नाही. याचं साधं कारण असं, की नवा समाज निर्माण झाल्याशिवाय खरं स्वातंत्र्य अस्तित्वातच आलेलं नसतं. शेंडी तुटो की पारंबी, म्हणत वास्तववादाची खुंटी घट्ट पकडून ठेवल्यास १९ व्या शतकापासून हाताळलेले वेगवेगळे घाट आणि रूपे अडगळीत टाकले जातील. मग आपण भूतकाळात रमायची प्रूधॉंनं केलेली चूकच करत राहणार. लोक नव्यानं घडत असतात, हे विसरून आपण त्यांना जुन्याच खोड्यात अडकवून ठेवू पाहात असतो. आपल्याला दोन बाबतीत सजग रहावं लागतं: एका बाजूला मुक्त वातावरणाला जन्म देणारी वैचारिक-सांस्कृतिक सामग्री उपलब्ध करून देत असतानाच दुसरीकडे शासकीय अनुदानाच्या खतावर अनावश्यक गवत माजणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागते.

आपल्या देशात यांत्रिक वास्तववादाची चूक आपण केलेली नाही; उलट त्याच्या विपरीतच होताना दिसते. याचं कारण नवी व्यक्ती जन्माला घालण्याची जाणीव अजून त्या तीव्रपणे झालेली नाही. हा नवा माणूस निश्चितच १९ व्या शतकाच्या पुढं जाणारा असेलच, पण त्याचबरोबर मृतवत असलेल्या नव्या ऱ्हासमान शतकाच्या संस्कृतीच्या विळख्यातूनही बाहेर पडलेला असेल.

आपल्याला जन्माला घातला पाहिजे, २१ व्या शतकातला मानव. त्या चित्राची केवळ रूपरेखाच आपल्या समोर आहे. पण आपल्या अभ्यासाचं हेच मुख्य उद्दिष्ट असलं पाहिजे. ठोस संशोधनाच्या आधारावर नवं सैध्दांतिक यश कमावलं तरच आपण मानवतेचं स्वप्न प्रत्यक्षात उतरवणारं मार्क्सवाद-लेनिनवादाचं ध्येय जागं ठेवलं, त्याला काही मौलिक योगदान दिलं असं मानता येईल.

एकोणिसाव्या शतकातील माणसाला प्रतिक्रिया देण्याच्या नादात आपण विसाव्या शतकाच्या ऱ्हासमान कर्दमात अडकून पडलो आहोत. ही काही अगदीच दुरूस्त करता येणार नाही, अशी चूक नाही. पण पुनरुज्जीवनवादाच्या आहारी जायचं नसेल तर तीवर मात केलीच पाहिजे. समुदाय प्रगतीच्या वाटेनं चालतच आहेत. समाजात नवनव्या कल्पना आणि विचार जोमानं रुजत आहेत. समाजातील हरेक व्यक्तीच्या एकात्म विकासाच्या ऐहिक शक्यता मोठ्या प्रमाणावर विस्तारल्या आहेत. वर्तमान हा लढ्याचा काळ आहे आणि भविष्य आपलंच आहे.

आपले कलाकार आणि विचारवंतांची एक मूलभूत कमजोरी असते: ते क्रांतीपासून चार हात दूर राहतात. बाभळीला बोरं लागत नसतात, हे खरंच. पण ही कमजोरी नसलेली नवी पिढी जन्माला येत असते. संस्कृतीचं क्षेत्र व्यापक झालं, अभिव्यक्तीच्या शक्यता विस्तारल्या की अस्सल कलावंत जन्माला येतात.

आजची पिढी विविध संघर्षांनी पोखरून निघालेली आहे, हे खरं. त्याच्या परिणामी तिच्यात कित्येक विकृती आल्या आहेत आणि ती हा विकृत वारसा पुढच्या पिढ्यांनाही देण्याचा धोका संभवतो. आपण अधिकृत, सरकारी विचारसरणीचे गुलाम निर्माण करता कामा नयेत की सरकारी पैश्यावर पोसलेले संशोधक. हे लोक केवळ उद्गारवाचक चिन्हांच्या दरम्यानचं स्वातंत्र्य उपभोगत असतात. खरे क्रांतिकारक लोकांच्या स्वरात नव्या माणसाचं गाणं गातील. ही गोष्ट एका रात्रीत होत नसते. आपल्या समाजात तरूणांची आणि पक्षाची भूमिका खास महत्त्वाची असते.

त्यातही तरूणांना जास्त महत्त्व असतं, कारण ते मातीचा गोळा असतात, देईल तसा आकार घेतात. आपण त्यांच्या सहभागाकडे आणि योगदानाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. शिष्यवृत्तीवर शिकणारे तरूण सुटीत आणि अगदी शिकण्याच्या दिवसातही शारीरिक काम करत असतात. काम हे काही बाबतीत त्यांना मिळालेलं बक्षीस असतं तर काही बाबतीत शिक्षणाचं साधन. परंतु, काम हे कधीही शिक्षा असत नाही. आता एक नवी पिढी जन्माला येत आहे.

पक्ष ही समाजाची बिनीची संघटना आहे. सर्वोत्कृष्ट कामगार हे तिचे सदस्य असतात. या बिनीच्या पथकात मोजकेच लोक असतात, पण त्यांच्या गुणवत्तेमुळे त्यांचा समाजावर मोठा प्रभाव असतो. आपला पक्ष ही समुदायांचा सहभाग असलेली संघटना बनवण्याची आपली आकांक्षा असते; पण त्यासाठी बिनीच्या स्थानावर काम करण्याची जाणीव समुदायात चेतावी लागते. आणि साम्यवादाचे शिक्षण त्यासाठी महत्त्वाचे असते. हे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवूनच आपण काम करत असतो. पक्ष ही एक जिवंत रचना असते; कार्यकर्त्यांची अमाप कष्टाची आणि त्यागाची तयारी असावी लागते. आपलं क्रांतिकार्य पुरं करण्यासाठी त्यांनी उदाहरण घालून देत समुदायांचं नेतृत्व केलं पाहिजे. आणि त्यासाठी त्यांना वर्गशत्रू, भूतकाळातून पदरी आलेले दोष, साम्राज्यवाद अशा प्रतिगामी शक्तींशी दोन हात करत बांधणी करावी लागते; वर्षानुवर्षे लढत राहावं लागतं.

आता आपण व्यक्तीची भूमिका काय असते, हे समजावून घेऊ. इतिहास घडवणाऱ्या समुदायांचं नेतृत्व माणूस

व्यक्ती म्हणूनच करत असतो. हे ठरवावं लागत नाही, हा आपला सार्वकालिक अनुभव असतो.

सुरवातीच्या काळात क्रांतीला प्रेरणा द्यायचं काम केलं फिडेलनं. तोच तिचा नेता होता. क्रांतीला त्यानंच दिशा दिली. पण त्याचवेळी त्याच्या सोबतीनं क्रांतिकारकांचा एक लढाऊ संच होता. आणि त्या मागोमाग पाठीशी होता, त्यांच्यावर विश्वास असलेला जनसमुदाय. जनसमुदायाच्या आकांक्षा प्रत्यक्षात कशा उतरवायच्या याची नेतृत्वाला जाण असल्यानं समुदायांची त्याच्यावर श्रध्दा होती.

हा निव्वळ ऐहिक सुखाचा मामला नसतो. खायचीप्यायची रेलचेल आहे की नाही, वर्षातून कितीवेळा समुद्रकिनाऱ्यावरील मौज लुटता येते, आजच्या पगारातून कोणत्या विदेशी वस्तू विकत घेता येतात हा मुद्दा महत्त्वाचा असत नाही. आंतरिक दृष्ट्या व्यक्ती किती समृध्द आहे, ती समाजाची जबाबदारी पेलण्यास किती समर्थ झाली आहे, यावर तिचं मूल्य ठरतं.

आपण त्यागमय अशा एका वैभवशाली कालखंडात जगत आहोत, याची व्यक्तीला पक्की जाणीव असते. त्याग हा त्यांचा श्वास आणि कष्ट हा त्यांचा उच्छवास असतो. याच भावनेतून ते सुरवातीला सिएरा माएस्त्राच्या लढाईत उतरले, आणि मग हा अनुभव साऱ्या क्यूबन जनतेचाच सार्वत्रिक अनुभव झाला. क्यूबा हे अमेरिकन क्रांतीतील बिनीचं पथक बनलं. बिनीच्या स्थानी असल्यानं त्याच्यावर अपूर्व त्यागाची जबाबदारी येते. लॅटिन अमेरिकन समुदायांना तो मुक्तीच्या मार्गावर घेऊन जात आहे. क्रांती सर्वस्वाचा त्याग मागते आणि देत तर काहीच नसते. ऐहिक लाभ ही काही क्रांतीची खरी प्रेरणा असत नाही. हे बिनीचे शिलेदार पुरं जाणून असतात. वेदना आणि त्याग हेच त्यांचं वैभव असतं.

कुणी हसेल, पण माझ्या दृष्टीनं खरा क्रांतिकारक हा प्रेमानं भारलेला असतो. प्रेमभावनेचा अभाव असणारा इसम क्रांतीच्या वाटेलाही जाणार नाही. हृदयात ऊब आणि डोक्यात थंडपणा हे क्रांतिकारकाचं खरं वैशिष्ट्य असतं. त्याच्या जोरावरच तो आणि ती जिवाला अतिशय त्रासदायक ठरू शकतील, असे निर्णय अजिबात विचलित न होता घेऊ शकतात. जनतेविषयीचं प्रेम ही क्रांतिकारकातील सर्वात पवित्र भावना असते. तिच्याशी ते अजिबात तडजोड करत नाहीत.

क्रांतिकारकांना बोबडं बोलणारी मुलं असतात, त्यांना प्रेमळ नवरा असतो, बायको असते. क्रांतीला तिच्या इच्छित स्थळी घेऊन जायचं, तर या सर्वांचा त्याग करायची तयारी असावी लागते. क्रांतीत सहभागी होणारे साथीदार, कॉम्रेड, हेच त्यांचे सुहृद आणि मित्र. त्या वर्तुळाबाहेर त्यांना जीवन असत नाही.

अशा परिस्थितीत क्रांतिकारकाच्या अंगी मानवतेचा सणसणीत अंश असावा लागतो. न्यायाची आणि सत्याची चाड असावी लागते. त्यासाठी पोथीनिष्ठा, ग्रांथिकता दूर सारून जनतेपासून असलेला दुरावा ओलांडावा लागतो. रक्तामांसाच्या माणसावरील प्रेम हीच आपल्या कार्याची प्रेरणा असावी लागते.

क्रांतिविचारामागे केवळ मनुष्यमात्रावरील प्रेम हीच एक सामर्थ्यशाली भावना असते. आणि क्रांतिकारकाच्या मृत्यूपर्यंत ती त्याच्या वा तिच्या साथीला असते. जागतिक स्तरावर समाजवाद उभारण्यासाठी आवश्यक ऊर्जा ही प्रेमभावनाच देत असते. स्थानिक कार्य पार पाडून झाल्यावर क्रांतिभावना बोथट झाल्यास, कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीय बंधुभगिनीभाव विसरल्यास क्रांतिकार्यावर मांद्य चढतं, साम्राज्यशाहीच्या आक्रमणापुढे ती विकलांग होऊन जाते. कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवाद हे क्रांतीचं केवळ कर्तव्य उरत नाही; तो तिचा जीवनरस असतो. याचं समुदायाला ज्ञान देत राहणं, हेच क्रांतिकारकाचं अंतिम लक्ष्य असतं.

प्राप्त स्थिती धोक्यांनी भरलेली आहे. इतक्या निगुतीनं जनतेशी बांधलेले दुवे तुटणं हा जसा एक धोका असतो, तसाच पोथीवरील भक्ती हाही एक धोका संभवतो. एकदा का क्रांतीला वाहून घेतलं की मुलाबाळांना वाऱ्यावर

सोडून द्यायचं असतं, कुटुंबाच्या सुखाची तमा बाळगायची नसते, असा समज होण्याची दाट शक्यता असते. सामान्य जनांना असतात, तशीच क्रांतिकारकांनाही मुलंबाळं असतात. क्रांती माणसांना दूर लोटत नसते. पण त्याचबरोबर क्रांतिकारकाची दृष्टी अढळ असली पाहिजे. त्याचं क्रांतीचं पोलाद सतत तावूनसुलाखून निघत राहिलं पाहिजे.

आम्ही अशी आगेकूच करत आहोत. आमच्या पथकाचं नेतृत्व फिडेल करतो, हे आम्ही अभिमानानं जाहीर करतो. ते जगाला ओरडून सांगताना आम्हाला ना भीती वाटते, ना शरम. त्याच्या पाठीशी आहेत पक्षाचे लढाऊ कार्यकर्ते; आणि त्यांच्या मागं बळ आहे जनसमुदायाचं. एका समान उद्दिष्टाच्या दिशेनं हा प्रवाह जोमानं वाटचाल करतो आहे. या समुदायातील माणसांना आपल्याला कुठं पोहोचायचं आहे, याची सुस्पष्ट जाणीव आहे. गरजेच्या प्रदेशातून बाहेर पडून मुक्तीच्या प्रदेशात प्रवेश करण्यासाठी ते सिध्द झाले आहेत.

हा क्रांतिप्रवण समुदाय स्वतःच संघटित होत राहतो. संघटना करण्याची निकडीची जाणीव ही त्यामागील मूलभूत प्रेरणा असते. आता ती फुटलेल्या बॉंबसारखी हजारो तुकड्या-तुकड्यात विखरून टाकता येईल, अशी गर्दी राहत नाही. गर्दीला असते तशी भविष्याची अनामिक भीती ही त्यांना एकत्र ठेवणारी शक्ती नसते. एकमेकांना तुडवायला मागंपुढं न पाहणाऱ्या गर्दीचं, जमावाचं रूपांतर आता मानवी व्यक्तींच्या समुच्चयात झालेलं असतं.

आता आपण देशाचे बिनीचे शिलेदार असल्यानं भविष्यात कसलाही त्याग करण्यासाठी आपण सदैव सिध्द असलं पाहिजे, याची त्यांना जाणीव असते. इतिहास घडवणारे नायक म्हणून वाटेल ती किंमत मोजायची त्यांची तयारी असते. अमेरिकेचे पुढारपण करणाऱ्या जनतेचे अग्रदल म्हणून पडेल ती किंमत मोजायला आपण सदैवच तयार असतो. आपल्यातील प्रत्येक जण तिचा वा त्याचा त्यागाचा हिस्सा पेलायला उत्सुक असतो. कर्तव्यपूर्तीचा आनंद हीच त्याची बक्षिसी असते, हेही त्यांना ठाऊक असतं. दूर क्षितिजावर नव्या स्त्रीपुरूषांच्या प्रतिमेची झलक दिसत असते; आणि ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी हरेक व्यक्ती जिवाच्या करारानं झटत असते.

मी काही निष्कर्ष काढणार आहे:

आपण समाजवादीच खऱ्या अर्थानं स्वतंत्र असतो, कारण आपण मानवी परिपूर्तीच्या दिशेनं वाटचाल करत असतो. आणि आपण खऱ्या अर्थानं परिपूर्ण असतो, कारण आपण खऱ्या अर्थानं स्वतंत्र असतो.

संपूर्ण स्वातंत्र्याची रूपरेखा तयार झाली आहे; आता फक्त त्यात विविध रंग भरायची, वेगेवेगळ्या रेषा गडद करायची गरज आहे. ते आपण करणार आहोत.

आपलं स्वातंत्र्य मिळवण्यासाठी, मिळवलेलं स्वातंत्र्य जोपासण्यासाठी आपण आपल्या रक्तामांसाची किंमत मोजली आहे. हा त्याग आपण आंधळेपणानं नव्हे, तर उघड्या डोळ्यांनी केला आहे. रक्त शिंपून ही स्वातंत्र्याची विलोभनीय इमारत आपण बांधत आहोत.

रस्ता दूरच्या पल्ल्याचा आहे; आडवळणांचा, खाचखळग्यांचा तर आहेच, परंतु अनोळखीही आहे. आपल्याला आपल्या मर्यादांची स्पष्ट जाणीव आहे. आपण २१ व्या शतकातला माणूस बनवणार आहोत – होय, आपणच बनवणार आहोत.

रात्रंदिनी युध्दप्रसंगात स्वतःला घडवत राहणार आहोत. नवनव्या तंत्रानं, नवनव्या साधनानं नवा माणूस घडवणार आहोत.

जनतेच्या आकांक्षा, तिचे श्रेष्ठ गुण अंगी बाणवू शकणाऱ्या व्यक्तीच त्यांचं नेतृत्व करत त्यांना संघटित करू

शकतात. मात्र, आपल्या मार्गावरून तसूभरही ढळणार नाही, याची त्यांना खातरजमा करावी लागते.

खाचखळगे भरत, काटकुटे साफ करत इतरांना चालण्यासाठी रस्ता सरधोपट करावा लागतो; हे काम बिनीच्या पथकाला करावं लागतं. त्यातल्या अस्सल घटकाला, पक्षाला.

युवावर्गच आहे आपण घडवू पाहात असलेल्या शिल्पाचा प्राथमिक घटक; आपल्या आशाअपेक्षा पूर्ण कराव्यात म्हणून आपण हे निशाण आपल्या हातून घेण्यास त्याला सिद्ध करत असतो.

या पत्रात मनातला भाव काही प्रमाणात जरी व्यक्त झाला असेल, तर हेतू साध्य झाला, असं म्हणता येईल. मित्र-मैत्रिणींनो, इन्कलाब झिंदाबाद!

देह जावो अथवा राहो ।
क्रांतिरंगी दृढ भावो ।।

* * *

# त्रिखंडाला संदेश

(आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकन जनतेच्या एकजुटीची संघटना - OSPAAAL - हवाना, क्यूबा यांनी १६ एप्रिल १९६७ रोजी प्रथम प्रकाशित केलेला लेख)

काळ आहे भट्टी पेटवण्याचा, तिच्या तेजानं दिशा उजळण्याचा
**- जोसे मार्ती**

जगाला ग्रासणारा शेवटचा वणवा पेटला होता त्याला एव्हाना एकवीस वर्षं झालीसुध्दा. कितीक भाषांत, कितीक पुस्तकांत आणि लेखांत जपानच्या पराभवाचा उत्सव साजरा केला जातोय. जगाची वाटणी वेगवेगळया तंबूत झाली आहे आणि त्या प्रत्येक तंबूत हा सण साजरा केला जातोय. या वाटणी झालेल्या जगाच्या कित्येक भागात आशेचं वातावरण आहे.

जागतिक युध्द टाळलेली ही एकवीस वर्षं. संघर्षानं ग्रासलेली तरी युध्दाच्या ज्वाळा चार हात दूर ठेवण्यात यशस्वी झालेली. या विश्वशांततेमुळे आपण समाधानी असल्याचं सांगितलं जातं. या शांततेच्या काळातही दारिद्र्य, वंचितता, शोषण याविरुद्ध आपली लढाई चालूच होती. जागतिक शांततेची ती फलप्राप्ती होती, हे विसरा असंही सांगितलं जातं. पण ती शांतता तरी खरी आहे का?

जपाननं शरणागती पत्करल्यानंतर ठायीठायी कित्येक लढाया झाल्या आहेत. आपण त्याची मोजदाद करायच्या फंदात पडणार नाही आहोत. वरवर शांत दिसणाऱ्या ढिगाऱ्याखाली कुठं कुठं आग धुमसत राहिली आहे, हेही दाखवायची तसदी आपण घेणार नाही आहोत. पण वास्तव समजायला केवळ दोन उदाहरणं पुरेशी आहेत: कोरिया आणि व्हिएतनामच्या युध्दांची.

युध्दाच्या ज्वालांनी कोरिया वर्षानुवर्षे भाजून निघाला होता. त्यात रानटीपणानं कळस गाठला. कोरियाच्या उत्तर भागात बॉंबचा अक्षरशः पाऊस पडला. कारखाने, शाळा, इस्पितळं - सारं सारं नष्ट झालं. एक कोटी लोकांच्या डोक्यावर छप्परही राहिलं नाही.

युनोचा बदनाम झेंडा हातात नाचवत अमेरिकेच्या लष्करी नेतृत्वाखाली डझनभर देशांनी कोरियावर आक्रमण केलं. अमेरिकेच्या राक्षसी लष्करानं दक्षिण कोरियन जनतेचा त्या युध्दात दारूगोळयासारखा वापर केला. दुसऱ्या बाजूला कोरियन जनता उभी होती. त्यांना साथ देत होते चीनचे स्वयंसेवक. आणि त्यांना शस्त्रास्त्रं पुरवली होती सोव्हिएत लष्करी यंत्रणेनं. सामुहिक विनाशाचं अण्वस्त्र सोडून एकही अत्याधुनिक अस्त्र वापरायचं अमेरिकेनं ठेवलं नाही. जीवजंतू वापरले तशीच रासायनिक अस्त्रंही वापरली.

व्हिएतनाममधील देशभक्त जनतेला तीन साम्राज्यवादी शत्रूंशी सतत लढावं लागलं. हिरोशिमा आणि नागासकीवर बॉंब पडण्याआधी जपान व्हिएतनामला जाळून काढत होता. मागोमाग फ्रान्सनं तेच केलं आणि

अमेरिकेनं तर क्रौर्याचा कळस गाठला.

आपल्या अमेरिका खंडात प्रदीर्घ काळ छोट्या छोट्या लढाया होत राहिल्या. काही ठिकाणी लष्करी बंडे तर काही देशांत जनतेचे स्वातंत्र्यलढे. क्यूबात क्रांती झाली आणि एक महत्त्वाचा प्रदेश म्हणून त्यानं जगाच्या जाणिवेत प्रवेश केला. त्या क्रांतीनं साम्राज्यवादी कमालीचे खवळले आणि त्या चिमुकल्या देशावर चालून गेले. आपल्या समुद्रकिनाऱ्यांच्या रक्षणासाठी क्यूबाला धावून जावं लागलं. आणि पाठोपाठ उभं राहिलं अण्वस्त्र युध्दाचं संकट. क्यूबाच्या प्रश्नी अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यात भडका उडाला असता तर जगाला युध्दाच्या खाईत ढकलून न भूतो न भविष्यति अशी माणसाची अवस्था झाली असती.

पण सध्या मात्र जागतिक अंतर्विरोधाचं मुख्य केंद्र बनलं आहे, व्हिएतनामचं द्वीपकल्प आणि त्याच्या लगतचा प्रदेश. लाओस आणि व्हिएतनाम आधीच यादवीनं जर्जर झाले होते. त्यात अमेरिकन साम्राज्यशाहीनं हस्तक्षेप करत त्यात आपली सर्व शक्ती पणाला लावली. अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे जगाचा हा सारा भाग कधीही पेट घेईल असं सुरूंगाचं कोठार बनून गेलं.

विशेषतः व्हिएतनाममध्ये हा अंतर्विरोध अतिशय टोकदार बनला आहे. त्या युध्दाचं इथं तपशीलानं वर्णन करायचा आपला उद्देश नाही. फक्त त्यातल्या काही ठळक मुद्द्यांचा ऊहापोह करायला हवा.

व्हिएतनामच्या वायव्य भागातील दिएन बिएन फू येथे फ्रेंचांचा मुख्य लष्करी तळ होता. त्या तळाला हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट सैन्यानं तब्बल ५७ दिवसांचा वेढा घालून अखेरीस ७ मे १९५४ रोजी बलवान फ्रेंच लष्कराचा दारूण पराभव केला. विजयी कम्युनिस्ट स्वातंत्र्यवादी आणि पराभूत फ्रेंच वसाहतवादी यांच्यात तह झाला. त्या तहाच्या करारावर जिनिव्हा येथे सह्या झाल्या. तहानुसार सुरवातीला व्हिएतनामचे दोन भाग करण्यात आले. १८ महिन्यात निवडणुका घेऊन लोकनियुक्त सरकार स्थापन करावं आणि देशाचे दोन्ही भाग कसे एकत्र करावेत, हे ठरवावं यावर एकमत झालं. त्यानुसार उत्तर व्हिएतनामवर हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक स्थापन झालं आणि दक्षिण व्हिएतनाम सम्राट बाओ दिनच्या अधिपत्याखाली देण्यात आलं. पण अमेरिकेनं या करारावर सही करायला नकार दिला. बाओ दिन आजवर फ्रेंचांच्या अधीन राहिलेला असल्यानं अमेरिकेचा त्याच्यावर विश्वास नव्हता. त्याच्या जागी अमेरिकेला आपल्या तंत्रानं वागणारा मनुष्य हवा होता. न्गो दिन दिएम हे बाहुलं अमेरिकेच्या हाती लागलं. त्याला जमेल तितकं पिळून घेतल्यानंतर सीआयएनं लष्करी बंड करून त्याला १९६३मध्ये ठार मारलं. बाहुल्याचा शोकात्म अंत झाला.

वरील करारावर सह्या झाल्यानं जनतेत उत्साह संचारला. दक्षिणेतील फ्रेंचविरोधी उठाव थांबवण्यात येऊन लोक जिनिव्हा करार अंमलात येण्याची वाट पाहू लागले. पण अमेरिकेच्या तंत्रानं होत नाहीत तोवर निवडणुका घेतल्या जाणार नाहीत, हे देशप्रेमी जनतेच्या लगेच लक्षात येऊ लागलं. अमेरिकेनं जणू आक्रमण करून दक्षिण व्हिएतनाम आपल्या ताब्यातच घेतला आहे. आपले पाच लाख सैनिक अमेरिकेनं त्या भागात घुसवले आहेत. स्थानिक लष्कराची नखंच जणू काढून टाकत त्याला आपल्या ताटाखालचं मांजर बनवलं आहे. त्यामुळे दक्षिणेत वारंवार लढायांची धुमश्चक्री चालू असते.

दोन वर्षांपासून अमेरिकेनं उत्तर व्हिएतनाममधील प्रजासत्ताकावर विनाकारण बॉंबवर्षाव सुरू केला आहे. सुरवातीला त्यांचं स्वरूप फुटकळ होतं. नंतर मात्र दिवसेंदिवस अमेकिन हवाई हल्ल्यांचा जोर वाढू लागला. उत्तर व्हिएतनाम उध्वस्त करण्याचे प्रयत्न अमेरिका करू लागली. बळाच्या जोरावर उत्तर व्हिएतनामचं प्रजासत्ताक नष्ट करण्याचे अमेरिकेचे मनसुबे स्पष्ट होऊ लागले.

अमेरिकेच्या या आक्रमक कारवायांना उत्तर व्हिएतनाममधील जनता स्वाभिमानानं प्रत्युत्तर देऊ लागली. तिनं अमेरिकेची १७०० हून अधिक विमानं पाडायची बहादुरी दाखवली. अमेरिकेच्या मुजोरीच्या विरोधात नवजात

व्हिएतनामला समाजवादी देशांनी युध्दसामग्री पुरवून मदत केली.

पण एक विषण्ण करणारं वास्तव ध्यानात घ्यायला हवं - ज्यांना जग पार विसरून गेलंय अशा जनतेच्या आकांक्षा मुखर करणारा व्हएतनाम एकाकी पडलाय. अमेरिकन तंत्रज्ञानाचे भेसूर हल्ले त्याला झेललेच पाहिजेत. त्याला जगातल्या महाशक्तीशी, महासत्तेशी लढावंच लागतंय – एकट्यानं!

व्हिएतनामच्या जनतेच्या पाठीशी जगातली प्रागतिक जनता उभी आहे खरी; पण तिचा पाठिंबा रोमन रिंगणात ग्लॅडिएटर्सना असलेल्या सामान्य जनतेच्या प्रोत्साहनासारखाच आहे. त्या आक्रमक मारेकऱ्यांचे बळी ठरलेल्यांच्या विजयाच्या घोषणा निरर्थक असतात, हे ठाऊक असूनही सामान्य लोक त्यांचा उद्‌घोष करत राहतात – जिंकला तरी त्याच्यासोबत आणि मृत्यू आला तरी त्याच्या सोबतच.

व्हिएतनाममध्ये इतिहासानं एक तर्कदुष्ट वळण घेतलं आहे. व्हिएतनामी जनतेचा एकाकीपणा पाहिला की त्या ज्वालांच्या वेदना आपल्यालाही भाजून काढू लागतात.

अमेरिकन साम्राज्यवाद स्वभावतःच आक्रमक आहे. त्याची महाभयानक गुन्हेगारी कृत्यं जगभरात ठायी ठायी दिसत आहेत.  मित्रांनो, तो गुन्हेगार आहे, हे आपल्याला ठाऊक आहेच. पण गरज पडली तेव्हा व्हिएतनामला समाजवादी जगाचा अतूट हिस्सा करण्यात चालढकल केलेल्यांच्या अपराधाचं काय? जागतिक युध्द पेटण्याचा धोका होता, हे खरंच; पण साम्राज्यवादालादेखील काही निर्णय घेणं भाग पडलं असतंच की. एकमेकांना शिवीगाळ करत आणि दुसऱ्याला अडकवण्यासाठी सापळे रचत भांडणाऱ्यांच्या पारड्यातही अपराधाचं माप टाकायला हवंच – जे भांडण समाजवादी जगाच्या दोन बड्या सत्तांनी बऱ्याच दिवसांपासून चालवलं आहे.

आपण एका प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर दिलं पाहिजे: व्हिएतनाम एकाकी पडलाय, की नाही? एकमेकांशी भांडणाऱ्या दोन शक्तींच्या मध्ये तोल सावरत राहायची कसरत त्याला करावी लागतेय, की नाही?

त्या जनतेच्या थोरवीपुढं आपण नतमस्तकच झालं पाहिजे. काय धैर्य, काय खंबीरता! हा चिमुकला देश आपल्या लढ्यातून जगाला काय काय शिकवतो! अमेरिकेतील अंतर्विरोध अतिशय स्फोटक बनत आहेत. त्या जनतेला त्यातून बाहेर काढण्यासाठी अध्यक्ष जॉन्सन यांनी अनेक आश्वासनं दिली आहेत. ती खरी जेव्हा व्हायची तेव्हा होतील. पण 'जगातील श्रेष्ठ समाज' निर्माण करायच्या घोषणेची मात्र व्हिएतनाममध्ये लक्तरं झालेली दिसत आहेत.

एका इवल्याश्या आणि अतिशय मागास देशानं जगातल्या सर्वशक्तीमान अशा साम्राज्यवादी उद्दाम राष्ट्राला घायाळ करून सोडलं आहे. युध्दापायी तिची वैभवशाली अर्थव्यवस्था जर्जर झाली आहे. माणसांचे मुडदे पाडणे हा त्याच्या मक्तेदारीचा नफा कमावणारा व्यवसाय होता, तो आता परवडेनासा झाला आहे. आणि त्या सत्तेच्या आक्रमकतेला भीक न घालता ताठ उभे असलेले व्हिएतनामचे सैनिक – कसली शस्त्रं आहेत, त्यांच्या हातात? अतिसंहारक शस्त्रास्त्रांपासून कसाबसा बचाव करणारी. पण त्यांच्या हृदयात आहे एक जबर शक्ती - मातृभूमीवरच्या, आपल्या माणसांवरच्या प्रेमाची, आणि अतुल धैर्याची. साम्राज्यवादाची व्हिएतनाममध्ये एखाद्या कोंडलेल्या श्वापदासारखी अवस्था झाली आहे; त्याच्या बाहेर पडायच्या वाटा बंद झाल्या आहेत. या कोंडीतून सन्मानानं बाहेर कसं पडायचं याची त्याला चिंता लागली आहे. त्यात उत्तर व्हिएतनामनं युध्द संपुष्टात आणण्यासाठी चार मुद्दे सुचवल्यानं तर साम्राज्यवादाची अवस्था जास्तच शोचनीय झाली आहे. त्यातून साम्राज्यवादाची युध्दखोरी आणखीच स्पष्ट झाली आहे. त्यामुळे ही लढाई आता एका निर्णायक टप्प्याला आली आहे.

अजून युध्दाच्या ज्वालांनी संपूर्ण जगाला ग्रासलेलं नाही म्हणूनच केवळ शांतता आहे, असं म्हणायचं. पण ती नावाची शांततादेखील धोक्यात आली आहे.  ती नष्ट करण्यासाठी अमेरिका जणू  अगदी उतावीळ झाली आहे.

आपण, जगातले शोषित लोक, काय करू शकतो? त्रिखंडातील जनतेची नजर व्हिएतनामवर खिळलेली आहे. कायमपणे युध्दाचा बागुलबोवा उभा करत साम्राज्यवादी मानवतेला आजवर वेठीस धरत आले आहेत. पण युध्दाच्या धमक्यांना भीक न घालणे, हेच शहाणपणाचं आहे. जिथं जिथं साम्राज्यवादी आक्रमक आहेत, त्या प्रत्येक आघाडीवर त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी ठामपणे उभं राहिलं पाहिजे.

ज्या ज्या ठिकाणी थोडीफार टिकून असलेली शांतताही धोक्यात आली आहे, अशा ठिकाणी आपण काय केलं पाहिजे? पडेल ती किंमत मोजून आपण स्वातंत्र्य मिळवलं पाहिजे.

जागतिक चित्र अतिशय जटील बनलं आहे. प्राचीन युरोपातील काही देशांनी अजून स्वातंत्र्याची लढाई सुरू केलेली नाही. भांडवलशाहीतील अंतर्विरोध समाजाला ग्रासतील इतके ते विकसित निश्चितच झाले आहेत; परंतु ना ते साम्राज्यवादाची कास धरू शकतात, ना स्वतःचा स्वतंत्र मार्ग चोखाळू शकतात. येत्या काही वर्षांत त्यांच्यातील अंतर्विरोध निश्चितच स्फोटक रूप धारण करतील. पण त्यांचे प्रश्न आणि त्या प्रश्नांची उत्तर आपल्यासारख्या अविकसित आणि अवलंबित देशांहून वेगळे असतील.

अमेरिका, आशिया आणि आफ्रिका हे तीन अविकसित खंड साम्राज्यवादी शोषणाचा आधार आहेत. त्यातील प्रत्येक देशाची स्वतःची अशी खास वैशिष्ट्ये आहेत खरी. तरीदेखील प्रत्येक खंडात जनतेची एकजूट घडवणारे काही घटकदेखील आहेत.

अमेरिका खंडातील देशांत काही एकजिनसीपणा आढळतो, पण त्यांच्यावर अमेरिकन मक्तेदार भांडवलाची संपूर्ण सत्ता आहे. बहुतेक ठिकाणी बाहुल्या राजवटी आहेत; आणि उरलेल्या ठिकाणच्या लहान लहान राजवटी अतिशय दुबळ्या आणि परावलंबी आहेत. आपल्या अमेरिकन मालकांचे आदेश झुगारण्याची त्यांची हिंमत नाही. तेथील अमेरिकेचे राजकीय आणि आर्थिक प्रभुत्व शिखराला जाऊन पोहोचलं आहे. त्यामुळे त्या अवस्थेत काही बदल झालाच तर ते अमेरिकेसाठी अहितकारकच ठरेल. जिंकलेले प्रदेश ताब्यात ठेवणं, हेच अमेरिकेसमोरील आव्हान आहे. आणि ते प्रदेश ताब्यात ठेवून राहणं, त्या देशांतील मुक्तीलढे दडपणं हेच अमेरिकेचं धोरण आहे. त्या मुक्तीलढ्यांमागे कोणती राजकीय प्रेरणा आहे, याच्याशी अमेरिकेला काहीही देणंघेणं नाही. प्रत्येक देशातील तो लढा मोडून काढणं, हे तिचं एकमेव उद्दिष्ट आहे.

“दुसरा क्यूबा कदापि होऊ देणार नाही”, ही अमेरिकेची घोषणा आहे. ते उद्दिष्ट समोर ठेवूनच अमेरिकेनं पनामाचं हत्याकांड केलं आणि डोमिनिकन रिपब्लिकमध्ये रक्तपात केला. अमेरिका खंडातील कोणत्याही देशात सत्तापालट करण्याचा आणि पर्यायानं अमेरिकन हितसंबंधांना आव्हान देण्याचा प्रयत्न झाल्यास हस्तक्षेप करण्यासाठी अमेरिकेचं सैन्य सतत खडं ठेवण्यात आलेलं आहे. अमेरिकेच्या या धोरणाविषयी कुणीही कसलेही प्रश्न उपस्थित करू नयेत, अशी अलिखित धमकावणीच जारी करण्यात आलेली आहे. अमेरिकेच्या अधिपत्याखालील ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स (OAS) ही संघटना या विभागात कितीही अप्रिय असली तरी तो अमेरिकेसाठी अगदी सोयीचा मुखवटा आहे. युनोची अकार्यक्षमता केवळ हास्यास्पदच नाही तर अतिशय शोककारक आहे. अमेरिका खंडातील स्वातंत्र्यप्रिय जनतेला ठेचून काढण्यासाठी त्या त्या देशांतील लष्कर सतत खडं असतं. त्या सर्वांनी मिळून जणू देशद्रोह्यांची आणि अट्टल गुन्हेगारांची आंतरराष्ट्रीय संघटनाच बांधली आहे. दुसरीकडे स्थानिक भांडवलदारांनी साम्राज्यशाहीपुढे कधीच नांगी टाकली आहे. ते अमेरिकेच्या हातातील हुकमाचे पत्ते बनले आहेत. त्या देशांतील जनतेपुढे दोनच पर्याय आहेत: भ्रामक क्रांती नाही तर अस्सल समाजवादी क्रांती.

आशिया हा एक वैशिष्ट्यपूर्ण खंड आहे. त्या देशांतील जनतेनं युरोपियन वसाहतवाद्यांविरुध्द लढून मिळवलेल्या स्वातंत्र्यानंतर त्या देशांत कमीअधिक प्रमाणातील प्रागतिक सरकारं स्थापन झाली आहेत. काही देशांत राष्ट्रीय मुक्तीचं उद्दिष्ट साध्य झालेलं असून उर्वरीत देशांनी साम्राज्यवादविरोधी धोरण रोखून धरलेलं आहे.

आर्थिक दृष्टीनं अमेरिकेला आशिया खंडात गमावण्यासारखं काहीच नव्हतं; शक्यता होती कमाईचीच. त्या देशांत वसाहतीनंतर झालेले बदल अमेरिकेच्या पथ्यावर पडले. एका बाजूला इतर वासाहतिक देशांची सत्ता उलथून टाकण्यासाठी कारवाया करायच्या आणि दुसरीकडे त्या देशांच्या अर्थव्यवस्था आतून पोखरायच्या, अशी अमेरिकेची रणनीती राहिलेली आहे. ती हे उद्योग कधी थेट करते तर कधी त्यासाठी जपानचा बाहुल्यासारखा वापर करते.

पण काही ठिकाणांना विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळे महत्त्व आलं आहे. विशेषतः इन्डो-चायनाला अमेरिकन लष्करी कारवायात विशेष महत्त्वाचं स्थान आहे. दक्षिण कोरिया, जपान, तैवान, दक्षिण व्हिएतनाम आणि थायलंड यांचा अमेरिका चीनला घेरण्यासाठी वापर करते.

अमेरिकेची चाल दुहेरी आहे: प्रजासत्ताक चीनला बाहेरून लष्करी वेढा घालायचा आणि तेथील भलीथोरली बाजारपेठ आतून काबीज करायची. त्यामुळे आशिया हा जगाचा नवा स्फोटक बिंदू बनला आहे. युध्दानं खदखदणाऱ्या व्हिएतनामच्या बाहेर दिसत असलेली आशियातील शांतता ही वरवरची आहे. प्रत्यक्षात तो खंड आतून धुमसतो आहे.

पश्चिम आशियातील देश या खंडात असले तरी तेथील अंतर्विरोधांचं स्वरूप खूप वेगळं आहे. साम्राज्यवादी देशांच्या चिथावणीनं इस्रायल आक्रमक बनला असून तो तेथील प्रागतिक देशांच्या विरोधात कारवाया करत असतो. तेथील शीतयुध्दाची परिणती कशात होईल, हे आज सांगणं कठीण आहे. पण कधीही स्फोट होऊ पाहणारा एक ज्वालामुखी त्या भागातही धुमसतो आहे, हे मात्र खरं.

आक्रमक अशा नववसाहतवादासाठी आफ्रिकेची भूमी तर एकदम भुसभुशीत आहे. बदललेल्या परिस्थितीत नववसाहतवादाला आपले काही अधिकार सोडावे लागलेले असले तरी विशेषतः आर्थिक बाबतीत तो जुन्या वसाहतवादाहून फारसा वेगळा असणार नाही.

जगाच्या या भागात अमेरिकेनं वसाहत केलेली नव्हती; परंतु नव्यानं मिळवलेल्या भागीदारांवर मात करून या भागात पाय रोवण्याचा अमेरिका शर्थीचे प्रयत्न करत आहे. अमेरिका अतिशय दूरदृष्टी बाळगत आफ्रिकेचा राखीव संसाधन म्हणून वापर करायची रणनीती आखत आहे. आज तिची गुंतवणूक दक्षिण आफ्रिकेतच असली तरी ती कॉंगो, नायजेरिया आणि इतर देशांत पध्दतशीर शिरकाव करत आहे. आता तेथील साम्राज्यवादी देशांतील आपसातील स्पर्धा रक्तरंजित बनू लागली आहे. आफ्रिका खंडात रक्षण करण्याइतकी अमेरिकेची गुंतवणूक नसली तरी अमेरिकन मक्तेदारांची गिधाडी नजर जगभर भिरभिरत असते: नफ्याच्या राशी जमवायची शक्यता नजरेला पडली, कच्च्या मालाचे साठे दिसले रे दिसले, की ते झडप घालायला तयारच असतात.

या पूर्वेतिहासामुळे जनतेच्या मुक्तीलढ्याच्या पाठीशी उभं राहण्याचा आपला निश्चय आणखीच बळकट होतो. ती जनता आज ना उद्या स्वतंत्र होणारच आहे.

एक क्षण थांबून आफ्रिकेवर नजर टाकल्यावर काय दिसतं? गिनी, मोझांबिक आणि अंगोला या पोर्तुगीज वसाहतीत मुक्तीलढ्याला चांगलाच जोर चढला आहे. या लढ्याला गिनीत यश दृष्टीपथात येऊ लागलं आहे आणि इतर दोन देशांतही यश फार दूर नाही. कॉंगोत पॅट्रिस लुमुम्बाचे वारसदार आणि त्शोम्बेचे सहकारी यांच्यात वाद उफाळून आला आहे. त्शोम्बेच्या गटानं आपल्या फायद्यासाठी मोठ्या भागावर वरवरची शांतता लादली असली तरी त्या ठिकाणी लढा तीव्र होणं अपरिहार्य आहे.

ऱ्होडेशियात (म्हणजे आताच्या झिंबाब्वेत - अनुवादक) वेगळीच समस्या आहे: ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी अल्पसंख्य असलेल्या गोऱ्यांच्या हाती सत्ता सोपवण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. आज त्यांनीच सत्ता बेकायदेशीरपणे काबीज

केलेली आहे. ब्रिटीश सरकार ऱ्होडेशियातील इयान स्मिथ यांच्या गोऱ्या राजवटीच्या काही धोरणांविषयी वरवर नाराजी दाखवत असले, तरी ते धूर्तपणे त्याला आतून फूसच देत आहे. काही कॉमनवेल्थ देशही त्या गोऱ्या राजवटीचं समर्थन करताना दिसतात. तथापि, आफ्रिकेतील बहुतेक सर्व कृष्णवर्णीय देश, ते आर्थिक बाबतीत ब्रिटीश साम्राज्यवादावर अवलंबून असले, तरी कारस्थानी ब्रिटिशांच्या विरोधातच उभे राहिलेले दिसतात.

ऱ्होडेशियातील देशप्रेमी जनतेस यश मिळालं, आणि  शेजारची आफ्रिकन राष्ट्रं या आंदोलनाच्या पाठीशी राहिली, तर त्या देशातील परिस्थिती अतिशय स्फोटक बनेल. पण सध्या तरी ह्या सर्व जटील प्रश्नांवर युनो, कॉमनवेल्थ आणि ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनिटीसारख्या निरुपयोगी संस्था निष्फळ चर्चेचं गुऱ्हाळ गाळत असल्यानं, त्यातून काही निष्पन्न होणार नाही.

आफ्रिकेत होणाऱ्या सामाजिक आणि राजकीय घडामोडींची परिणती खंड व्यापणाऱ्या क्रांतीत होण्याची शक्यता मात्र दिसत नाही. पोर्तुगिजांच्या विरुद्धचा मुक्तीलढा खात्रीनं यशस्वी होऊ शकतो. मात्र, साम्राज्यवादी जगतात पोर्तुगालला काडीचंही महत्त्व नाही. असं असलं तरी पोर्तुगीज वसाहतींतून मुक्त होण्यासाठी चाललेला लढा आपण कदापि थांबवता कामा नये. त्या क्रांतीची मुळं आणखी खोल रुजवली पाहिजेत.

ऱ्होडेशिया आणि दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीय जनसमुदाय अस्सल क्रांतिसंघर्षात उतरतील, तेव्हाच आफ्रिकेत नवी पहाट उगवेल. त्यासाठी, तेथील गोरगरीब जनता सत्ताधारी टोळक्यांच्या कचाट्यातून आपलं प्रतिष्ठित जीवन मुक्त करण्यास सरसावली पाहिजे.

आजवर एकच गोष्ट होत आली आहे: एकामागोमाग एक होणाऱ्या लष्करी क्रांत्या. विद्यमान सत्ताधारी आपल्या गटाचे, जातीचे  किंवा त्यांची पाठराखण करणाऱ्या सामाजिक सक्तीचे हितसंबंध जोपासत नाही, असं दिसताच लष्कराचं एक टोळकं सत्ता ताब्यात घेतं. त्या सत्तेविरुध्द दुसरं टोळकं उठतं. अशा रीतीनं लष्करी बंडांची ही मालिका सतत चालू राहते. पण जनतेचा सहभाग असलेला उठाव मात्र होत नाही. कॉंगोमध्ये लुमुम्बाच्या स्मृती जाग्या होऊन एक नवी दिशा काहीशी उजळली खरी, परंतु गेल्या काही महिन्यात त्यांची ताकद खच्ची होऊ लागली आहे.

आशियातील परिस्थिती किती स्फोटक बनली आहे, हे आपण पाहिलं आहेच. या स्फोटक परिस्थितीची केंद्रं केवळ व्हिएतनाम आणि लाओस यापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. जिथं कोणत्याही क्षणी लष्करी आक्रमण करण्यासाठी अमेरिकेचे हात शिवशिवत आहेत असा कंबोडिया असो की थायलंड, मलाया आणि अर्थातच इंडोनेशिया, इथंही नवनवी स्फोटक केंद्रं निर्माण होत आहेत. इंडोनेशियात तर प्रतिगामी सत्तेवर येताच त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा समूळ उच्छेद करण्यास निष्ठूरतेनं सुरवात केली तरी तेथील क्रांतीच्या ज्वाळा विझवता आलेल्या नाहीत. त्याचबरोबर, मध्यपूर्व – पश्चिम आशिया - देखील भडकत आहे.

लॅटिन अमेरिकेतील ग्वाटेमाला, कोलंबिया, व्हेनेझुएला आणि बोलिव्हिया या देशांतील जनता सशस्त्र लढा करते आहे. पाठोपाठ ब्राझीलमध्येदेखील उठाव होताना दिसत आहे. कित्येक ठिकाणी वारंवार उठाव होतात आणि ते दडपलेही जातात. पण एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे: या खंडातील जवळजवळ सर्वच देश क्रांतीच्या उंबरठ्यावर असून समाजवादी दिशा दाखवणारं सरकार स्थापन होईपर्यंत त्या क्रांतीच्या ज्वाला थंडावणार नाहीत.

हा सर्व खंडभर एकच भाषा बोलली जाते. त्याला ब्राझीलचा अपवाद असला तरी तेथे बोलली जाणारी भाषा स्पॅनिश भाषेच्या साधर्म्यामुळे सहज समजण्यासारखी आहे. तसेच, या सर्व देशांतील वर्गांमध्ये कमालीचं साम्य आहे. त्या सर्वांची, अख्ख्या खंडभर, अमेरिकानो म्हणून ओळखली जाणारी अस्मिता निर्माण झाली आहे. ते सारे देश स्वत:ला 'अमेरिकानो' म्हणवून घेतात. भाषा, सवयी, रीतीरिवाज, धर्म, परकीय सत्ता हे सारे त्यांना एक करणारे समान घटक आहेत. आपल्या अमेरिकेतील सर्वच देशांतील शोषणात कमालीचं साम्य आहे. शोषित आणि

शोषक यांच्यातही मोठं साम्य आहे. त्यामुळे क्रांती वेगानं परिपक्व होत आहे.

एका प्रश्नाचं उत्तर आपल्याला शोधावं लागेल: ही क्रांती कशी विकसित होईल, तिचं स्वरूप कसं राहील? 'आपल्या अमेरिकेतील' देशोदेशीच्या आजच्या क्रांतिप्रक्रियेतील घटक विलक्षणरित्या समान आहेत. त्यामुळे ही क्रांती काही कालावधीतच अख्खा खंड पादाक्रांत करील, असा आपला विश्वास आहे. मानवतेच्या मुक्तीसाठी जनता ठायी ठायी संघर्षरत झाल्याचे आपल्याला दिसून येईल.

आजचे उठाव या खंड ग्रासणाऱ्या युध्दातल्या केवळ छोट्या छोट्या लढाया आहेत. पण या लढायातही किती हुतात्मे अमर झाले आहेत! मानवाच्या सर्वंकष मुक्तीसाठी चाललेल्या या युध्दाचा हा अंतिम सर्ग हजारो हुतात्मे आपल्या रक्तानं लिहीत आहेत. ग्वाटेमाला, कोलंबिया, व्हेनेझुएला आणि पेरूतील तुर्शियो लिमा, धर्मगुरू कॅमिलो तोरेस, फॅब्रिशिओ ओयेडा, लोबाटन आणि लुई दि ला प्युएन्ते युचेडा या लढवय्यांची नावं क्रांतिक्षितिजावर कोरलेली आढळतील. पिढ्यान पिढ्यांना ते मानवमुक्तीची प्रेरणा देत राहतील.

जनता आंदोलनात सक्रिय असली, की ती नवनवे नेते जन्माला घालते. मग सेझार मॉन्तेस आणि यॉन सोसा हे ग्वाटेमालात; फाबिओ व्हॅझ्क्वेझ आणि मारूलांदा हे कोलंबियात; डग्लस ब्राव्हो आणि अमेरिको मार्टीन व्हेनेझुएलाच्या सीमेवर क्रांतीचं निशाण फडकवत धीरानं खडे होतात.

'आपल्या अमेरिकेतील' या आणि इतर अनेक ठिकाणी नवनवे उठाव होत राहतील. बोलिव्हियात तर तो सुरूच झाला आहे. “आधुनिक क्रांतिकारक” या अतिशय जोखमीच्या पण अत्यंत तेजोमय व्यवसायात तरूण धडाडीनं उतरत आहेत. हा व्यवसाय प्रत्येक तरूणाला आणि तरूणीला मोठं वैभवशाली बनवत राहील. त्यातील कित्येकजण धारातीर्थी पडतील. काही चुकांना ठेचकाळतील. काहींचा पाय पुढेच पडत राहील. क्रांतीच्या उबदार कुशीतून नवनवे लढवय्ये जन्म घेत राहतील. युध्दाच्या गर्भातून जनतेचे नवे योध्दे जन्म घेत राहतील – आणि अमेरिकेच्या भाडोत्री गुंडांचे अत्याचारही वाढतच जातील. ज्या ज्या देशातील जनता सशस्त्र उठाव करत आहे, त्या प्रत्येक ठिकाणी अमेरिका शस्त्रास्त्रांचा वर्षाव करत आहे.

अमेरिकेनं प्रशिक्षित केलेल्या आणि शस्त्रं पुरवलेल्या पेरूच्या लष्करानं ती शस्त्रं वापरून तेथील क्रांती चिरडून टाकली. पण क्रांतिकारकांत पुरेशी राजकीय आणि लष्करी प्रगल्भता आली, की क्रांतीला हरवणं अवघड होईल आणि मग अमेरिकेला आणखी रसद पुरवण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही. पेरूमध्ये आजवर अज्ञात असलेले लढवय्ये आणि त्यांच्यामागील शक्ती नवनवी गनिमी पथके स्थापन करू लागले आहेत. छोट्या छोट्या सशस्त्र टोळ्यांचा बंदोबस्त करायला पुरेशी असलेली शस्त्रं आणि तंत्रं तेथील लष्कर आजवर वापरत आलं आहे. त्यांना शस्त्रास्त्रं आणि इतर लष्करी मदत पुरवून अमेरिका दडपशाही वाढवत ठेवील. तेही अपुरं पडू लागलं, सरकारी लष्कराचे गडकिल्ले ढासळू लागले, की अमेरिकन सैन्य थेट हस्तक्षेप करू लागेल. तेथील जनतेनं आता व्हिएतनामचा मार्ग स्वीकारला पाहिजे. 'आपल्या अमेरिके'नं व्हिएतनामकडून शिकलं पाहिजे. आपल्या अमेरिकेतील देशोदेशी क्रांतिकारकांची सशस्त्र पथकं एकमेकांच्या कामात सुसूत्रता प्रस्थापित करू शकतात. एकजुटीनं अमेरिकेला अडचणीत आणून क्रांतीची विजयी पताका उंच फडकवत ठेवू शकतात.

जगातील स्वातंत्र्यलढे जणू अमेरिका खंडाला विसरून त्याला वळसा घालून निघून गेले होते. आता त्याचे पडसाद त्रिखंडात उमटू लागले आहेत. आणि त्याचं प्रवक्तेपण स्वीकारलं आहे, क्यूबन क्रांतीनं. क्यूबन क्रांतीवर आता विशेष जबाबदारी येऊन पडली आहे: जगात दुसरं व्हिएतनाम, तिसरं व्हिएतनाम घडवून आणायची!

साम्राज्यवाद ही जागतिक व्यवस्था आहे, ती भांडवलशाहीची अंतिम अवस्था आहे आणि जागतिक स्तरावर भिडूनच तिचा पराभव होऊ शकतो, हे आपण कदापि विसरता कामा नये. साम्राज्यशाही नष्ट करणे, हेच आपल्या रणनीतीचं अंतिम उद्दिष्ट असलं पाहिजे. राष्ट्राराष्ट्रांवर दडपशाही करून त्यांच्या शोषणातून एका बाजूला भांडवल,

कच्चा माल, तंत्रज्ञ आणि स्वस्त श्रमशक्ती; आणि दुसऱ्या बाजूला  तेथे नव्या भांडवलाची आणि शस्त्रास्त्रांची निर्यात आदींच्या जोरावर साम्राज्यशाही तगून राहते. ही सर्व तिच्या वर्चस्वाची साधनं आहेत. त्यांचा बेसुमार वापर करून त्या राष्ट्रांना सर्वस्वी आपले मांडलिक करून टाकते. साम्राज्यशाहीच्या अस्तित्वाचा हा पाया उखडून टाकण्याची सर्व अविकसित आणि शोषित विभागांची जबाबदारी आहे.

अशा रीतीनं या सर्व जनतेची सर्वंकष मुक्ती हे  आपल्या रणनीतीचं अंतिम उद्दिष्ट असलं पाहिजे. त्यासाठी अनेक ठिकाणी प्रसंगी सशस्त्र लढे उभे करायची तयारी असली पाहिजे. आपल्या अमेरिकेत तर समाजवादी क्रांतीच ही मुक्ती प्राप्त करू शकते.

साम्राज्यवादाचा प्रेरणास्रोत अमेरिका, USA,  हा देश आहे, हे ध्यानात ठेवल्याशिवाय त्याचा विनाश करणं शक्य नाही.

आपलं सर्वसाधारण उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी शत्रूला त्याच्या नैसर्गिक पर्यावरणातून बाहेर खेचून जिथलं वास्तव त्याच्या जगण्याच्या सवयींना उपकारक नाही, अशा मैदानात आणलं पाहिजे. आपल्या शत्रूला बिलकूल कमी लेखता कामा नये; अमेरिकन सैनिकाच्या हाती असलेली  तांत्रिक सिध्दता, त्याला असलेली अत्याधुनिक शस्त्रास्त्रं आणि अपार समृध्दीचं पाठबळ यामुळे तो अतिशय भीतीदायक मनुष्य बनतो. पण त्याच्याजवळ एक अतिशय महत्त्वाची शक्ती नाही, जी त्याच्या प्रतिस्पर्धी व्हिएतनामी सैनिकाच्या अंगी ठासून भरलेली आहे, ती म्हणजे “विचारसरणी”. आपल्या शत्रूच्या लष्कराचं नीतीधैर्य खच्ची करूनच आपण त्याच्यावर मात करू शकतो; आणि त्यासाठी त्याचा वारंवार पराभव केला पाहिजे, त्याला वारंवार माती खायला लावली पाहिजे.

पण हे विजयाचं रेखाचित्र असंच नाही तयार झालं. ते रेखण्यासाठी जनतेला असीम त्याग करावा लागला आहे. आता नव्यानं तो त्याग आपणाला केला पाहिजे, अगदी या क्षणापासून. उघड्या डोळ्यांनी. इतरांनी खस्ता खाऊन आपली मुक्ती करावी करावी, म्हणून आपण लढाई टाळत राहिल्यास होणारा छळ त्यागाच्या त्रासाहून असह्य असेल.

मुक्तीच्या लढाईत शेवटच्या क्रमांकावर राहिलेल्या देशात कदाचित सशस्त्र लढा न करता आणि साम्राज्यशाहीविरुद्ध रक्तरंजित युध्द न छेडता मुक्ती मिळवता येईलही. परंतु, जागतिक स्तरावर अशी मुक्ती रणाविण मिळणे अशक्य आहे. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागालाही सीमा असणार नाहीत. आपण भविष्य पाहू शकत नाही, हे खरंच; परंतु, स्वातंत्र्याची आस तर आहे पण त्यासाठी काहीही प्रयत्न न करता ते आपोआप हातात पडण्यासाठी तिष्ठत बसलेल्या देशाचं नेतृत्व करायच्या मोहाला क्रांतिकारकांनी बळी पडता कामा नये.

अर्थात, निरर्थक त्याग हा टाळायलाच हवा. त्यामुळे आश्रित करण्यात आलेल्या अमेरिकेला मुक्त करण्यासाठी उपलब्ध असलेला शांततापूर्ण लढ्याचा एकही मार्ग सोडता कामा नये. असं असलं तरी या बाबतीत आपली भूमिका स्पष्ट आहे. लढाई सुरू करण्यासाठी आताची वेळ योग्य असेल अथवा नसेलही. पण कसलाही लढा न करता स्वातंत्र्य पदरात पडेल हा भ्रम मात्र आपण कदापि बाळगता कामा नये; तो अधिकार आपल्याला नाही. आणि ही लढाई काही केवळ अश्रुधुराच्या नळकांड्या नामोहरम करण्यासाठी रस्त्यारस्त्यात दगडांनी करायची असणार नाही, अथवा ती शांततापूर्ण सार्वत्रिक संपापुरती मर्यादित असणार नाही. तशीच ती संतापलेल्या जनतेनं सत्ताधारी वर्गाची ठाणी चारदोन दिवसात उध्वस्त करणारी असणार नाही.  ही लढाई प्रदीर्घ काळ चालणारी आहे; गनिमी काव्यानं लढणाऱ्या तिच्या शिलेदारांना ती घराघरात, शहराशहरात, रक्तपात केलेल्या गावागावात, शत्रूनं बॉम्बवर्षाव करून उध्वस्त केलेल्या वस्त्यावस्त्यात हरघडी करावी लागणार आहे.

ते आपल्याला अशा लढाईत ढकलत आहेत; आपल्यासमोर पर्यायच नाही: त्यासाठी तयार असलंच पाहिजे आणि अंगावर येईल तेव्हा शिंगावर घेतलंच पाहिजे.

त्या लढाईचा प्रारंभही काही साधा सरळ आणि सहज सोपा असणार नाही. या दुष्ट कंपूशाहीची सत्ता हातात असतील नसतील ती रानटी शस्त्रं वापरून, जमावाच्या टोळधाडींना चिथावून आपल्या अंगावर सोडतील. या युध्दाच्या पहिल्या चरणात तगून राहण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल; त्या नंतर मात्र गनिमी काव्यानं लढणाऱ्या लढवय्याचं अनुकरणच आपल्याला करावं लागेल: सशस्त्र प्रचार. व्हिएतनामी अर्थाचा सशस्त्र प्रचार. प्रचाराच्या बंदुका आणि गोळ्या. शत्रूशी केलेल्या दोन हातांच्या, जिंकलेल्या आणि हरलेल्या लढायांच्या प्रचाराचा वर्षाव. ज्यांना सर्वस्वी लुटलं आहे अशा वंचित समुदायांच्या, या बहुजनांच्या जिगिषेची प्रेरक कथांची पारायणं करत राहणं. राष्ट्रीय भावना एकसंध आणि मजबूत करणं; नवनवीन, जास्तीतजास्त कठीण आव्हानं पेलण्यास सिध्द होणं; शत्रूच्या वाढत्या रानटीपणासमोर बेडर छातीनं उभं राहणं. या शत्रूच्या अंगी माणुसकीचा लवलेशही नाही. इच्छा असूनही त्याच्यावर प्रेम करणं शक्य नाही. त्याच्याविषयीचा संताप हा या लढ्याचा आवश्यक घटक आहे. माणसाला काही स्वाभाविक मर्यादा असतातच. पण शत्रूचा दुष्टावा इतका टोकाचा असतो, की या मर्यादांची चौकटही मोडून पडू लागते. अन्यायाची चीड न येणारे लोक रानटी शत्रूवर मात करू शकत नाहीत.

शत्रू ज्या ज्या कान्याकोपऱ्यात युध्द घेऊन जातो, तिथं तिथं ते आपण लढलं पाहिजे. त्याच्या घरात घुसून, त्याच्या मनोरंजनाच्या ठिकाणी जाऊन ते लढलं पाहिजे. हे सर्वंकष युध्द आहे. त्याला क्षणाचीही स्वस्थता मिळू देता कामा नये; तो बराकीत असो की बराकीच्या बाहेर, त्याला उसंत देता कामा नये. तो असेल तिथं त्याच्यावर तुटून पडलं पाहिजे. जाईल तिथं त्याला पळायला वाट मिळणार नाही, अशी या जनावराची कोंडी केली पाहिजे. मग त्याच्या नीतीधैर्याचा गंड, अहंकार खचायला लागेल. मग तो आणखी पाशवी बनू लागेल. पण त्याच्या दुखऱ्या, कमजोर जागाही वरचेवर दृग्गोचर व्हायला लागतील.

आपण बांधायला लागू या, खरा कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवाद. त्याचं असेल स्वतःचं कामगारवर्गीय लष्कर. मानवतेचं निशाण हातात फडकवत लढणारं. व्हिएतनाम, व्हेनेझुएला, ग्वाटेमाला, लाओस, गिनी, कोलंबिया, बोलिव्हिया, ब्राझील इथं लढणाऱ्या निशाणाच्या सावलीत देह धारातीर्थी ठेवणारं. हे स्वप्नवत ध्येय कुणा अमेरिकन, आशियायी, आफ्रिकन अगदी युरोपियन माणसास हवंहवंसं वाटणार नाही?

ज्यांच्या निशाणाखाली आपण जन्म घेतला नाही अशा भूमीत सांडलेल्या रक्ताचा थेंब न थेंब मागं जगणाऱ्यांना प्रेरणा देत राहतो. अशांच्या मुक्तिलढ्याच्या रोपट्यालाही त्या रक्ताचं शिंपण ऊर्जा देतं. कोणत्याही देशाची मुक्ती हा दुसऱ्या देशाच्या मुक्तीलढ्याचा अनिवार्य टप्पाच असतो.

आपल्यातील सर्व भेदाभेद नष्ट करून मुक्तिलढ्याला सर्वस्व अर्पण करण्याचा क्षण आला आहे.

मुक्तीसाठी लढणाऱ्या जगाला विविध मतभेदांनी, वादविवादांनी ग्रासलेलं आहे, याची आपल्याला स्पष्ट जाणीव आहे. त्याच्यावर पांघरूण घालता येत नाही, हे खरंच. ते मतभेद आता इतके तीव्र आणि कडवट झाले आहेत की त्यातून सुसंवाद साधणं अशक्य नसलं तरी अतिशय दुस्तर झालेलं आहे. एकमेकांना पाण्यात पहाणाऱ्यांत संवाद घडवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे, असं वाटेल; पण समोर शत्रू उभा ठाकलेला आहे. तो रोज हल्ले करतो आहे. आणि तो ते करतच राहील: आज, उद्या परवा. त्याचे हल्लेच आपली एकजूट घडवून आणतील. ज्यांना हे प्रथम समजेल आणि जे अनिवार्य अशा एकजुटीसाठी सिध्द होतील, त्यांच्या प्रति जनता कृतज्ञ राहील.

दोन्ही बाजू आपापली मतं अत्यंत कडवटपणे लढवत राहतात. कधी आपण या मताचे असू तर कधी दुसऱ्या; कधी एकाचं जास्त मान्य असेल तर कधी दुसऱ्याचं; पण आपणा वंचितांना यापैकी कोणतीही एक बाजू पत्करणं परवडणारं नाही. युद्धकाळात असे मतभेद व्यक्त करत राहणं ही कमजोरी ठरते. केवळ शब्द वापरून मतभेद दूर होतील हा भ्रम आहे. हे मतभेद इतिहासच दूर करील किंवा त्यांना त्यांच्यात खरा अर्थ भरून त्यांना आशयघन बनवील.

आजच्या या संघर्षाच्या काळात कोणते डावपेच स्वीकारायचे, कृती काय करायची, तात्कालिक कोणती उद्दिष्टे साध्य करायची या साऱ्या बाबतीत आपल्यात खूप मतांतरं असू शकतात. पण आपण दुसऱ्याच्या मताचा आदर केला पाहिजे. पण साम्राज्यवादाचा सशस्त्र पराभव करण्याच्या बाबतीत आपण कदापि तडजोड करता कामा नये. आपण काय करू पाहत आहोत? साम्राज्यवादाभवती अमेरिकेनं तटबंदी उभारून ती संहारक शस्त्रांनी सज्ज ठेवली आहे. ही तटबंदीच समूळ उध्वस्त करायची आहे. एक एक करत देशोदेशीच्या जनतेला मुक्त करायचं आहे. शत्रूला एकेका रणभूमीवरून पळवून लावलं पाहिजे. त्यानं उभे केलेले किल्ले जमीनदोस्त केले पाहिजेत, त्याच्या रसदीच्या वाटा तोडल्या पाहिजेत, दुसऱ्याच्या जागी केलेल्या वस्त्यांतून त्यांना हुसकावून लावलं पाहिजे. लुटीसाठी ताब्यात घेतलेला प्रत्येक प्रदेश मुक्त केला पाहिजे.

हे दीर्घकाळ चालणारं युद्ध आहे. आणि पुन्हा पुन्हा सांगितलं पाहिजे, ते अतिशय क्रूर आहे. त्याविषयी कुणीही गैरसमजात राहता कामा नये. जनतेवर काय परिणाम होतील या चिंतेनं रणातून पळ काढता कामा नये. आपण काळाची हाक कानाआड करता कामा नये. हरघडीच्या शोकांतिका, पावलोपावली उभा असलेला मृत्यू यांची तमा न बाळगता अंतिम विजय संपादन करण्याच्या ईर्षेनं व्हिएतनाम अथक शौर्यानं लढतो आहे.

ऐषारामात आयुष्य कंठलेले अमेरिकन सैनिक अतिशय असुरक्षित परिस्थितीत, जीव मुठीत घेऊन शत्रूच्या प्रदेशात कसाबसा तग धरून आहेत. कधी घात होईल, यानं भयभीत आहेत. मृत्यूनं अचानक झडप घालू नये, म्हणून बराकीतून बाहेर पडू धजत नाहीत. संपूर्ण जनतेशी त्यांनी शत्रुत्व पत्करल्याचे परिणाम त्यांना भोगावे लागत आहेत. त्याचे अमेरिकेच्या अंतर्गत विपरीत परिणाम होणार आहेत. आजवर दडपून टाकलेल्या शक्ती उसळून येणार आहेत. त्या देशाच्या चार भिंतींच्या आतही वर्गसंघर्ष उफाळून येणार आहे.

एक, दोन, तीन व्हिएतनाम जगभरात ठिकठिकाणी जन्माला आल्यास, विनाश, मृत्यू आणि शोकांतिका यांच्याशी धैर्यानं पदोपदी सामना करत, जगभरातील दडपलेल्या, शोषित जनतेच्या मनात विद्रोहाच्या ठिणग्या पेरत राहतील. जगभरात ठिकठिकाणी कळीकाळाला भीक न घालणारे एक, दोन, तीन व्हिएतनाम जन्माला येत अन्यायाच्या तटबंद्या उध्वस्त होत राहतील. अशा वेळी जगभर घोंगावणारं मुक्तीचं वादळ कुणीही थोपवू शकणार नाही. मानवतेचं भविष्य उज्ज्वल आहे.

आपल्या एकजुटीचे आघात जास्त मजबूत करू शकलो, ते नेमक्या लक्ष्यावर करत राहिलो, लढणाऱ्या जनतेला हवी ती सारी मदत, पाठबळ देत राहिलो - तर ते भवितव्य फार दूर नाही!

जगाच्या नकाशावर आपण एका ठिपक्यावर उभे आहोत. तिथंच असलेलं आपलं कर्तव्य पार पाडू शकलो, मानवमुक्तीच्या लढ्यातला आपला खारीचा वाटा उचलू शकलो, आपला प्राण देऊ शकलो, जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात आपल्या वाट्याला आलेल्या, आपण रक्त शिंपून मुक्त केलेल्या भूमीवर शेवटचा श्वास घेऊ शकलो, कामगारवर्गाच्या सैन्यातील एक शिपाई म्हणून आपल्यावर पडेल ती कामगिरी पार पाडू शकलो, तर आपल्याला कृतकृत्य झाल्याचं समाधान मिळेल. आपल्याला क्यूबन क्रांतीपासून शिकल्याचा अपरिमित अभिमान आहे. आपलं त्या क्रांतीच्या महान नेत्यावर असीम प्रेम आहे. त्यानं शिकवलं आहे: "मानवतेचं अस्तित्वच कसाला लागलं असताना व्यक्तीच्या वा देशाच्या त्यागाची वा त्यांच्यापुढील धोक्याची पोकळ भाषा कशाला करता?"

आपण साम्राज्यवादाविरुद्ध रणशिंग फुंकलं आहे. मानवतेच्या शत्रूसंगे युद्ध करायचं स्तोत्र मुखोद्गत केलं आहे. तो शत्रू आहे अमेरिका. साक्षात मृत्यू आपल्यासमोर उभा राहून आपल्याला चकित करू पाहील: आपण त्याचं प्रेमानं स्वागत करू या. पण ते करताना एका गोष्टीची मात्र खातरजमा करू या: आपल्या रणभेरींचा निनाद स्वागतशील कानांवर पडला आहे, आपल्या हातातील शस्त्र घ्यायला आणखी एक हात उत्सुकतेनं पुढं आला आहे, मशीनगनच्या तालावर उच्चरवात मृत्यूचा पोवाडा गात युद्धावर अंतिम विजय मिळण्यास मानवता सज्ज होत आहे.

* * *

## 'चे' पुस्तक आणि आंतरराष्ट्रीय डावे प्रकाशन व्यासपीठ

जगातील सुमारे वीसेक डाव्या प्रकाशन संस्थांनी एकत्र येऊन जवळजवळ तितक्याच भाषांमध्ये चे हे पुस्तक संयुक्तरित्या प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांना उपलब्ध व्हावे यासाठी ते मोफत ई-बुक म्हणून प्रकाशित करायचे ठरले. भारतापासून ते दक्षिण अमेरिकेपर्यंत मराठी, मल्याळी, तामीळ, कन्नड, बंगाली, तेलुगु, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्लिश पासून ते स्लोव्हेनियन, स्पॅनिश आणि पोर्तुगीज या भाषांतील प्रकाशक या कामासाठी एकत्र आले आहेत.

हा या प्रकारचा तिसरा प्रकल्प. प्रथम लेनिन १५० (लेनिनच्या १५० व्या जन्मदिनी) आणि मारियातेगुई ही दोन पुस्तके अशी संयुक्तरित्या प्रकाशित करण्यासाठी काही प्रकाशक एकत्र आले होते. आताच्या प्रकल्पात मात्र असा सहयोग करणाऱ्यांची संख्या कित्येक पट झाली आहे.

यापूर्वी डाव्या प्रकाशकांनी एकत्र येऊन रेड बुक दिन साजरा केला होता. २१ फेब्रुवारी हा कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचा प्रकाशन दिन. त्या निमित्ताने २१ फेब्रुवारी २०२० रोजी कित्येक शहरातील हजारो लोक सार्वजनिक ठिकाणी जमले आणि त्यांनी कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचे जाहीर वाचन केले. आता २१ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी पाळला जाणार आहे.

या पुस्तकात 'चे' ने लिहिलेले 'त्रिखंडाला पत्र' व 'क्यूबातील समाजवाद आणि माणूस' हे अतिशय गाजलेले लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या लेखांतून त्याचा आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन आणि क्यूबामध्ये समाजवादाची बांधणी कशा रीतीने केली जात आहे, याचे मनोज्ञ दर्शन होते.

या लेखांना सुप्रसिद्ध विचारवंत ऐजाझ अहमद यांची अभ्यासपूर्ण प्रतिज्ञा लाभली असून मारिया देल कार्मेन अरिएत गार्सिया यांचा या लेखांवरील एक अभिप्राय लाभलेला आहे. ऐजाझ अहमद हे जागतिक कीर्तीचे मार्क्सवादी विचारवंत सध्या 'ट्रायकॉन्टिनेन्टल: इन्स्टिट्यूट फॉर सोशल रिसर्च' मध्ये ज्येष्ठ संशोधक आहेत तर मारिया गार्सिया या हवाना येथील 'चे गव्हेरा इन्स्टिट्यूट'मधील संशोधक आहेत.

पुस्तकाचे मुखपृष्ठ 'ट्रायकॉन्टिनेन्टल'चे प्रधान डिझायनर तिंग्ज चॅक यांनी बनवलेले आहे. 'चे' रेडिओ रेबेल्डेवर बोलत असताना घेतलेल्या फोटोवर ते चित्र आधारलेले आहे.

Batalla de Ideas (Argentina)
www.batalladeideas.com.ar

Bharathi Puthakalayam (India)
www.thamizhbooks.com

Chintha (India)
www.chinthapublishers.com

Deshar Katha (India)

Editorial Caminos (CMMLK, Cuba)
ww.ecaminos.org

El Colectivo (Argentina)
www.editorialelcolectivo.com

Expressao Popular (Brazil)
www.expressaopopular.com.br

Fondo Editorial Fundarte (Venezuela)
www.fundarte.gob.ve

Gonoprokashon (Bangladesh)

Simón Bolívar Institute (Venezuela)
www.isb.ve

Janashakti Prakashan (India)

Kriya Madyama (India)

LeftWord (India)
www.mayday.leftword.com

Naked Punch (Pakistan)
www.nakedpunch.com

Nava Telangana (India)
www.navatelanganabooks.com

Ojas: Vidyarthi Ni Pahel (India)

Prajasakti (India)
www.psbh.in

Tricontinental. Institute of Social Research
www.thetricontinental.com

Vam Prakashan (India)
mayday.leftword.com/vaam-prakashan/

Založba /*cf (Slovenia)
www.zalozbacf.si